सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शूक्रवार, दि. १० जुलै २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ८७ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## सोन्या- चांदीत घसरण

मुंबई : इराण-अमेरिका तणाव, जागतिक आर्थिक अनिश्रि्चतता आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील बदलांचा परिणाम भारतीय सराफा बाजारावर स्पष्टपणे दिसून आला आहे. गुरुवारी देशभरात सोन्या-चांदीच्या दरात मोठी घसरण नोंदविण्यात आली. २४ कॅरेट सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम १ लाख ४३ हजार ८९० रुपये, तर चांदीचा दर प्रति किलो २ लाख २३ हजार रुपये इतका खाली आला आहे.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराण-अमेरिका शांतता करार पूर्णपणे संपुष्टात आल्याचे वक्तव्य केल्यानंतर मध्यपूर्वेतील भू-राजकीय तणाव पुन्हा वाढला आहे. या घडामोडींमुळे जागतिक कमोडिटी बाजारात अस्थिरता निर्माण झाली असून त्याचा थेट परिणाम भारतीय सराफा बाजारावर झाला आहे.सुरक्षित गुंतवणुकीचा पर्याय मानल्या जाणाऱ्या सोन्या-चांदीच्या किमतींमध्ये झालेल्या या घसरणीमुळे गुंतवणूकदारांचे लक्ष पुन्हा बाजाराकडे वेधले गेले आहे. आंतरराष्ट्रीय कॉमेक्स बाजारात सोन्याच्या दरात सुमारे ०.३७ टक्क्यांची घसरण झाली असून भाव ४,०६७ डॉलर प्रति औंस इतका राहिला आहे. तर चांदीच्या किमतीत ०.८५ टक्क्यांची घसरण होऊन ती ५८.०४५ डॉलर प्रति औंस दराने व्यवहार करत आहे.

## राज्यात समान नागरी संहिता उच्चस्तरीय समिती स्थापन

तभा वृत्तसेवा

मुंबई : महाराष्ट्रात समान नागरी संहितेचे नियम तयार करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज (दि. ९ जुलै) विधानसभेत केली.समिती सर्व घटकांचा अभ्यास करून शिफारसी सादर करणारराज्यात सर्वांसाठी समान कायदा असावा आणि सामाजिक सलोखा राखला जावा यासाठी हे महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ही समिती सर्व घटकांचा अभ्यास करून आपले नियम आणि शिफारसी सरकारला सादर करेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.




समान नागरी संहितेचे नियम तयार करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीत कायदेतज्ज्ञ, प्रशासकीय अधिकारी आणि सामाजिक क्षेत्रातील दिग्गजांचा समावेश करण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाचे ३ माजी न्यायाधीश, १ घटनातज्ज्ञ, १ माजी सनदी अधिकारी आणि सामाजिक क्षेत्रातील २ व्यक्ती अशा एकूण सदस्यांचा यात समावेश आहे.ही उच्च स्तरीय समिती अशी आहे : अध्यक्षः न्या.रंजना देसाई (माजी न्यायमूर्ती, सर्वोच्च न्यायालय)सदस्यः न्या.आर. सी. चव्हाण (माजी न्यायमूर्ती, उच्च न्यायालय), न्या.एस. जी. मेहरे (माजी न्यायमूर्ती, उच्च न्यायालय), डी. के. जैन (माजी मुख्य सचिव), सदस्यः बीरेंद्र सराफ (माजी टर्नी जनरल / घटनातज्ज्ञ) रमेश पतंगे (वरिष्ठ सामाजिक कार्यकर्ते, पद्मश्री पुरस्कार विजेते )डॉ. सुवर्णा रावल (प्रसिद्ध शिक्षण-तज्ज्ञ).

## ऑपरेशन सिंदूर'चा डंका जगभर

वृत्तसंस्था

मेलबर्न : पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या तीन दिवसांच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहेत. गुरुवारी त्यांनी मेलबर्न येथे भारतीय समुदायाला संबोधित केले. या भव्य कार्यक्रमात सुमारे ३० हजार भारतीय सहभागी झाले होते. भारतीय समुदायाशी संवाद साधताना पंतप्रधान मोदी यांनी पुन्हा एकदा 'ऑपरेशन सिंदूर'चा उल्लेख केला.

पंतप्रधान मोदी म्हणाले, ऑपरेशन सिंदूर अंतर्गत दहशतवादी तळांवर झालेल्या स्फोटांचा आवाज संपूर्ण जगाने ऐकला. ऑपरेशन सिंदूरदरम्यानचा डेमो तुम्ही पाहिलाच असेल. स्फोट शेजारी देशात होत होते, पण त्यांची दणदणाट जगभर ऐकू येत होती. दहशतवादी छावण्यांवर झालेल्या या कठोर प्रहाराचा तुम्हाला अभिमान वाटला की नाही? भारत इथेच थांबू इच्छित नाही. भारत म्हणत आहे - 'ग्रो मोअर, ग्रो मोअर'.

पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे म्हणाले, आपण भारतीय असे आहोत की जसे दुधात साखर मिसळली की ते अधिक गोड होते. त्याचप्रमाणे आपण भारतीय जगभर प्रेम आणि आपुलकीची गोडी पसरवत असतो.घरात येणारे दूध ऑस्ट्रेलियाचे असले तरी त्यापासून बनणारा चहा भारतीयच असतो.ते म्हणाले, भारतामध्ये सध्या 'भजन क्लबिंग'चा नवा ट्रेंड सुरू झाला आहे. आपली जनरेशन झेड (ऋक्षप न) ही परंपरा पुढे नेत आहे. ऑस्ट्रेलियामध्येही तुमचे आठवड्याचे शेवटचे दिवस श्रद्धा आणि अध्यात्माने परिपूर्ण असतात, असे मी ऐकले आहे. कुठे कोणाच्या घरी भगवान सत्यनारायणाची कथा असते, कुठे गुरुद्वारात अरदास असते, कुठे मुले भांगडा सादर करत असतात, तर कुठे भरतनाट्यमचा कार्यक्रम होत असतो. काही ठिकाणी क्रिकेट स्पर्धाही सुरू असतात.व्हेनेझुएलामधील भूकंपानंतर भारतीय सैन्याने राबवलेल्या 'ऑपरेशन अमिस्ताद'चा उल्लेख करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, भारत नेहमीच आपत्तीच्या काळात मदतीसाठी पुढे येतो. आम्ही मदत करताना नागरिकांचा पासपोर्ट पाहत नाही. आज संपूर्ण जग भारतावर विश्र्वास ठेवते. त्यांनी तुर्किये आणि सीरियामध्ये झालेल्या भूकंपाच्या वेळी भारताने दिलेल्या मदतीचाही उल्लेख केला. तसेच, क्रीडा क्षेत्रातील भारताच्या योगदानावरही त्यांनी प्रकाश टाकला. (पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, मला आनंद आहे की शिक्षण, कौशल्य विकास आणि नवोपक्रम (इनोव्हेशन) या क्षेत्रांमध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील संबंध अधिक दृढ आणि मजबूत होत आहेत.

## उसनवारीवर चालक !

मुंबईः मुंबई महापालिकेने आपल्या विविध विभागांतील चालकांची गरज भागववण्यासाठी बेस्टकडून १९० चालक उसनवारीवर घेण्याचे ठरवले असून या प्रस्तावाला बुधवारी स्थायी समितीने मंजुरी दिली. ३० कोटी ६२ लाख रुपयांचा हा प्रस्ताव असून यानुसार प्रतिचालक महापालिका महिन्याला १ लाख २९ हजार मोजणार आहे.या प्रस्तावला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), काँग्रेस, आणि एमआयएमच्या सदस्यांनी तीव्र विरोध केला. मात्र विरोधकांचा सर्व आक्षेप आणि सूचना फेटाळून सत्ताधाऱ्यांनी हा प्रस्ताव मंजूर केला.

शिवसेना (उबाठा ) पक्षाचे नगरसेवक यशोधन फणसे यांनी या प्रस्तावावर जोरदार आक्षेप घेतले. बेस्टकडून आपण जे चालक घेतोय, त्यांच्यासाठी प्रतिमहिना १ लाख २९ हजार रुपये खर्च येणार आहे.

## राज ठाकरे यांची देवेंद्र फडणवीसांवर टीका



तभा वृत्तसेवा

मुंबई : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर विविध मुद्द्यांवरून जोरदार टीका केली. विधानसभेतील मुख्यमंत्र्यांच्या भाषणाचा संदर्भ देत, विरोधकांनी सरकारला प्रश्न विचारले की त्याला लगेच 'राजकारण' असे संबोधले जाते, असा आरोप त्यांनी केला.

महाराष्ट्र नवनिर्माण रेल्वे कामगार सेनेच्या १९व्या वर्धापन दिन सोहळ्यात ते बोलत होते.राज ठाकरे म्हणाले की, आज विरोधक एखाद्या प्रश्नावर बोलले की त्याला राजकारण म्हटलं जातं. पण जेव्हा दुसऱ्या पक्षाचं सरकार होतं, तेव्हा आंदोलने, टीका आणि प्रश्न उपस्थित करणं हे राजकारण नव्हतं का? मुंबईतील पायाभूत सुविधांवरील वाद आणि 'मिसिंग लिंक' प्रकरणाचा उल्लेख करत राज ठाकरे म्हणाले की, लोक विकासकामांतील त्रुटींवर प्रश्न विचारत आहेत. त्याचा अर्थ महाराष्ट्राचा अपमान होत नाही.त्यांच्या मते, सरकारच्या कामावर टीका केली की राज्याचा किंवा देशाचा अपमान झाल्याचा दावा करणे चुकीचे आहे.

केंद्र सरकारच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित केला की देशविरोधी आणि राज्य सरकारवर टीका केली की महाराष्ट्राचा अपमान, ही भूमिका योग्य नाही, असे ते म्हणाले.राज ठाकरे यांनी सोशल मीडियावरील राजकीय प्रचाराचाही उल्लेख केला. गेल्या काही वर्षांत विरोधकांविरोधात अपमानास्पद भाषा वापरणाऱ्या यंत्रणा उभ्या करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.ज्या पद्धतीने विरोधकांना लक्ष्य करण्यासाठी वातावरण तयार करण्यात आलं, त्याचाच फटका आता सत्ताधाऱ्यांनाही बसत आहे, असा दावा त्यांनी केला.

## माजी सरकारी अधिकाऱ्याच्या घरातून २२ किलो सोनं–चांदी, १.६२ कोटींची रोकड जप्त

वृत्तसंस्था



आग्रा : उत्तर प्रदेशातील आग्रा येथे एका माजी प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्याच्या घरावर टाकलेल्या छाप्यात कोट्यवधी रुपयांची बेहिशोबी मालमत्ता उघडकीस आली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (व्हिजिलन्स) कारवाईदरम्यान घरातून मोठ्या प्रमाणात सोनं, चांदी, रोख रक्कम आणि स्थावर मालमत्तेची कागदपत्रे जप्त करण्यात आली.

तपास पथकाने दिलेल्या माहितीनुसार, माजी अधिकारी ललित कुमार यांच्या निवासस्थानी छापा टाकल्यानंतर सुमारे २२ किलो सोन्या-चांदीचे दागिने, विटा आणि बिस्किटे सापडली. यामध्ये सुमारे १३ किलो सोनं आणि ९ किलो चांदीचा समावेश असल्याचे सांगण्यात आले आहे.

याशिवाय घरातून १.६२ कोटी रुपयांची रोख रक्कमही जप्त करण्यात आली. विविध ठिकाणी ठेवलेल्या नोटांच्या बंडलांची मोजणी करण्यासाठी तपास यंत्रणेला मोठी मेहनत घ्यावी लागली. तपासादरम्यान माजी अधिकाऱ्याच्या नावावर आग्रा आणि इतर भागांमध्ये अनेक प्लॉट, शेतीजमीन आणि आलिशान मालमत्ता असल्याची माहितीही समोर आली आहे. या सर्व मालमत्तेची बाजारातील किंमत कोट्यवधी रुपयांच्या घरात असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.बेहिशोबी मालमत्ता बाळगल्याच्या आरोपांप्रकरणी सुरू असलेल्या तपासा अंतर्गत ही कारवाई करण्यात आली असून, जप्त केलेल्या मालमत्तेचा स्रोत आणि आर्थिक व्यवहारांची चौकशी सुरू आहे. संबंधित प्रकरणात पुढील कायदेशीर कारवाई सुरू असल्याची माहिती तपास यंत्रणेकडून देण्यात आली आहे.

## 'तृणमूल'ची खाती गोठवली; खात्यात ४४० कोटी रुपये

वृत्तसंस्था



कोलकाता : निधी गैरव्यवहार आणि आर्थिक अपहारप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) तृणमूल काँग्रेसची सुमारे ४४०.४२ कोटी रुपये जमा असलेली तीन बँक खातीमनी लाँडरिंग प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (पीएमएलए) गोठवल्याची माहिती दिली. या कारवाईबाबत 'तृणमूल'कडून तत्काळ कोणतीही प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. पीएमएलएच्या कलम १७ (१अ) अंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे. या तरतुदीनुसार संबंधित मालमत्ता किंवा बँक ठेवी जप्त करणे शक्य नसल्यास आणि त्या इतरत्र हस्तांतरित होण्याची शक्यता असल्यास 'ईडी'ला ती गोठवण्याचा अधिकार आहे.

दरम्यान, या खात्यांमध्ये असलेल्या निधीची माहिती सादर करण्याचा आदेश कलकत्ता उच्च न्यायालयाने संबंधित खासगी बँकेला दिला होता. बँकेने न्यायालयात अहवाल सादर केला असला, तरी न्यायालयाने तो उघडला नाही आणि सुनावणी गुरुवारपर्यंत तहकूब केली. ईडीच्या प्राथमिक तपासानुसार, एप्रिल २०२३ ते जून २०२६ या कालावधीततृणमूल काँग्रेसच्या खात्यांमधून सुमारे १६० कोटी रुपये केअरवेल एव्हिएशन आणि तिच्याशी संबंधित कंपनीकडे वर्ग करण्यात आले. या कंपनीने ८२.९६ कोटी रुपये नव्याने स्थापन करण्यात आलेल्या संबंधित संस्थेकडे वळवून एंब्रेअर लेगसी ६०० हे खासगी विमान आणि अगस्ता १०९ ग्रँडन्यू हेलिकॉप्टर खरेदीसाठी वापरल्याचा दावा 'ईडी'ने केला आहे.

## लग्न समारंभात हत्याकांड

तिरुपती : प्रसिद्ध देवस्थान असलेल्या तिरुपती शहरात एका लग्न सोहळ्यादरम्यान झालेल्या दुहेरी हत्याकांडामुळे संपूर्ण परिसर हादरून गेला. जुन्या कौटुंबिक वादातून दोघांवर प्राणघातक हल्ला झाला. एक जण घटनास्थळीच ठार झाला, तर दुसऱ्याचा रुग्णालयात नेत असताना मृत्यू झाला.कौटुंबिक वादातून हत्याकांडप्राथमिक तपासात हे हत्याकांड कौटुंबिक वादाशी संबंधित असल्याचे समोर आले आहे.

## वीर जिवाजी महाले स्मारक उभारणार

तभा वृत्तसेवा



सातारा : किल्ले प्रतापगडाच्या पायथ्याशी वीर जीवाजी महाले यांचे भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या प्रकल्पासाठी प्रथम टप्प्यात १ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी गुरुवारी विधानसभेत दिली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्णयातून हा प्रकल्प साकार होणार असल्याचे देसाई यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या महाबळेश्र्वर दौऱ्यादरम्यान विविध शिवप्रेमी संघटनांनी वीर जीवाजी महाले यांचे स्मारक उभारण्याची मागणी केली होती. त्यानंतर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करून पर्यटन विभागामार्फत प्रतापगडाच्या पायथ्याशी भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. देसाई म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याच्या इतिहासात वीर जीवाजी महाले यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रतापगडाच्या ऐतिहासिक लढाईत त्यांनी समयसूचकता, धाडस आणि पराक्रमाचे दर्शन घडवत छत्रपती शिवाजी महाराजांचे प्राण वाचवले. होता जीवा म्हणून वाचला शिवा ही उक्ती त्यांच्या शौर्याची साक्ष देणारी असल्याचे त्यांनी नमूद केले.दरवर्षी १० नोव्हेंबर रोजी प्रतापगडावर शिवप्रताप दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या सोहळ्यासाठी लाखो शिवप्रेमी, इतिहास अभ्यासक, विद्यार्थी तसेच देश-विदेशातील पर्यटक प्रतापगडाला भेट देतात. त्यामुळे प्रतापगडाचे ऐतिहासिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्व सातत्याने वाढत असल्याचेही त्यांनी सांगितले.

## रविवारी महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा

तभा वृत्तसेवा

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणारी ' महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा २०२५' येत्या रविवारी, १२ जुलै, २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे.

या परीक्षेच्या पार्श्र्वभूमीवर आयोगाने उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाच्या आणि कडक मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. नियमांचे उल्लंघन केल्यास उमेदवारांवर थेट कारवाई करण्यात येईल, असा इशाराही आयोगाने दिला आहे.




## एफडीएचा मोर्चा आता थेट बड्या दुग्ध उत्पादक कंपन्यांकडे !

तभा वृत्तसेवा



पुणे : दुधात होणारी भेसळ रोखण्यासाठी मागील काही दिवसांपासून अन्न व औषध प्रशासनाकडून राज्यभरात धाडसत्र सुरू आहे. विविध दुकानांवर धाडी टाकण्यात येत असताना आता एफडीएने थेट मोठ्या कंपन्यांकडे आपला मोर्चा वळवला आहे. अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) इंदापूर आणि मंचर परिसरातील दोन बड्या दुग्धजन्य पदार्थ उत्पादक कंपन्यांची तपासणी केली.

यापूर्वी कारवाई झालेल्या दूध संकलन केंद्र, दूध शीतकरण केंद्र (चिलिंग सेंटर) किंवा संबंधित आस्थापनांकडून या कंपन्या दूध खरेदी करतात का, त्यांच्याशी कोणताही व्यावसायिक संबंध आहे का, तसेच भेसळयुक्त दूध पुरवठ्याशी काही सबंध आहे का, याची पडताळणी करण्यासाठी तपासणी करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. 'एफडीए'च्या पथकाने दूध खरेदीच्या नोंदी, पुरवठादारांची माहिती, गुणवत्ता याबातची तपासणी केली. ही मोहीम आणखी दोन दिवस सुरू राहणार असून, त्यानंतर मिळालेल्या निष्कर्षांच्या आधारे पुढील कारवाईचा निर्णय घेतला जाणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. एफडीए आणि पोलिस प्रशासनाने रविवारी पुणे, अहिल्यानगर, सोलापूर, जालना आणि ठाणे जिल्ह्यांतील १३ आस्थापनांवर धाडी टाकून कारवाई केली होती. तपासात पाणी, स्किम्ड मिल्क पावडर, व्हे (डेअरी परमिएट) पावडर, इमल्सिफायर, डिटर्जंट किंवा शाम्पू, पामतेल यांचे मिश्रण करून कृत्रिम दूध तयार केले जात होते. हे कृत्रिम दूध नैसर्गिक दुधात मिसळून बाजारात विकले जात असल्याचे तपासात उघड झाले होते, असे 'एफडीए'च्या पथकाने केलेल्या तपासणीत उघड झाले होते.

पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ (कात्रज डेअरी) संदर्भातील तक्रारींची सखोल चौकशी करून, दोन महिन्यांत अहवाल सादर करण्यात येईल. चौकशीत बोगस दूध संस्था, आर्थिक गैरव्यवहार किंवा अन्य अनियमितता आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल, अशी माहिती सहकार मंत्री अतुल सावे यांनी विधानपरिषदेत दिली. आमदार योगेश टिळेकर यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे हा मुद्दा उपस्थित केला होता. चर्चेत आमदार सदाभाऊ खोत, बच्चू कडू आणि अरुण लाड यांनीही सहभाग घेतला. मंत्री सावे यांनी सांगितले, की 'कात्रज डेअरीसंदर्भात दोन जून २०२६ रोजी प्राप्त झालेल्या तक्रारींनंतर दहा जूनला विभागीय उपनिबंधक यांना चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार ११ जून रोजी सहायक निबंधक आणि जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांची द्विसदस्यीय चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे. आवश्यक असल्यासअन्न व औषध प्रशासन विभागाच्याअधिकाऱ्यांचाही समितीत समावेश केला जाईल.' राज्यातील दूध आणि दुग्धजन्य पदार्थांतील भेसळ, कृत्रिम दूधनिर्मिती आणि अन्नसुरक्षा नियमांच्या उल्लंघनाला आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने राज्यभर कठोर मोहीम हाती घेतली आहे. नव्या आदेशानुसार, कच्च्या दुधाच्या विक्रीसाठी स्वतंत्र नियम लागू करण्यात आले असून प्रत्येक पात्रावर 'कच्चे दूध' असा स्पष्ट उल्लेख आणि हे दूध सेवनापूर्वी उकळणे आवश्यक आहे अशी सूचना देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### पावसानंतर शंखी गोगलगायींचा वाढता प्रादुर्भाव; शेतकऱ्यांनी तातडीने उपाययोजना कराव्यात

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्ह्यात काही भागांत पाऊस पडल्यानंतर सुप्तावस्थेतील शंखी गोगलगायी मोठ्या प्रमाणात बाहेर पडताना दिसत आहेत. त्यामुळे सोयाबीन, कापूस, भाजीपाला पिके तसेच फळबागांमध्ये नुकसान होण्याची शक्यता वाढली आहे. विशेषतः कोवळ्या रोपांच्या व पानांच्या अवस्थेत या गोगलगायींचा प्रादुर्भाव अधिक घातक ठरत असल्याने शेतकऱ्यांनी सतर्क राहून सामूहिकरीत्या एकात्मिक उपाययोजना कराव्यात, असे आवाहन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्रातील तज्ज्ञांनी केले आहे.

डॉ. डी. डी. पटाईत, डॉ. जी. डी. गडदे आणि एम. बी. मांडगे यांनी दिलेल्या माहितीनुसार, शंखी गोगलगायी प्रामुख्याने रात्री अथवा पहाटे सक्रिय असतात. दिवसा त्या दगडाखाली, तणामध्ये, पिकांच्या अवशेषांमध्ये किंवा इतर ओलसर व सावलीच्या ठिकाणी आश्रय घेतात. सतत ढगाळ वातावरण, जास्त आर्द्रता आणि शेतात पाणी साचून राहिल्यास त्यांचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढतो. प्रादुर्भाव झालेल्या शेतात कोवळी पाने कुरतडलेली दिसतात, नव्याने उगवलेली रोपे रात्रीच्या वेळी खाल्ली जातात, पानांवर व जमिनीवर चिकट श्लेष्माचा चमकदार माग दिसून येतो तसेच गोगलगायी व त्यांची अंडी मोठ्या प्रमाणात आढळतात. अशी लक्षणे दिसून आल्यास त्वरित नियंत्रणात्मक उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले.

गोगलगायींचे नियंत्रण करण्यासाठी सायंकाळी अथवा सूर्योदयापूर्वी त्या हाताने गोळा करून मिठाच्या किंवा साबणाच्या पाण्यात टाकून नष्ट कराव्यात. तसेच शेतात गवताचे ढीग, ओले गोणपाट किंवा भाजीपाल्याचे अवशेष ठेवून सापळे तयार करावेत. सूर्योदयानंतर त्याखाली जमा झालेल्या गोगलगायी आणि अंडी गोळा करून नष्ट करावीत. शेतातील तण, दगड, कचरा व पिकांचे अवशेष नियमित साफ ठेवावेत. शेतात पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. गोगलगायींना आकर्षित करण्यासाठी पपई किंवा कोबीच्या पानांचा वापर करून आमिष तयार करता येते. तसेच आवश्यकतेनुसार शिफारशीनुसार मेटाल्डिहाईडयुक्त गोगलगायनाशकाचा वापर करावा, असेही मार्गदर्शन करण्यात आले आहे.

पावसानंतर सलग तीन ते पाच दिवस सकाळी व सायंकाळी शेताची नियमित पाहणी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सुरुवातीच्या अवस्थेत प्रादुर्भाव लक्षात आल्यास कमी खर्चात आणि प्रभावी नियंत्रण मिळविता येते. एका शेतात उपाययोजना करून अपेक्षित यश मिळत नसल्याने गाव किंवा परिसरातील सर्व शेतकऱ्यांनी एकाच वेळी सामूहिकरीत्या उपाययोजना कराव्यात, असेही कृषी तज्ज्ञांनी स्पष्ट केले.

अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्र, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांच्या ०२४५२-२२९००० या दूरध्वनी क्रमांकावर किंवा ८३२९४३२०९७ या व्हॉट्सप हेल्पलाईनवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### भूमिगत गटार व समांतर पाणीपुरवठा योजनेच्या सुधारित प्रस्तावास मंजूरी : महानगरपालिकेची स्थायी समितीची बैठक

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील मंजूर असलेल्या भूमिगत गटार आणि समांतर पाणीपुरवठा योजनेच्या कामाचा पुनर्विचार करून वाढलेल्या वस्त्यांचा समावेश असलेला सुधारित प्रस्ताव तयार करण्यास परभणी महानगरपालिकेच्या स्थायी समितीने मंजुरी दिली आहे. बुधवारी (दि.०८) झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आला.

स्थायी समिती सभापती प्रतिभा अतुल सरोदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस आयुक्त नितीन नार्वेकर, नगर सचिव विकास रत्नपारखे यांच्यासह स्थायी समितीतील सदस्य भगवानराव वाघमारे, सुनील देशमुख, नदीम इनामदार, आकाश लहाणे, डॉ. केदार खटींग, अक्षय देशमुख, व्यंकट डहाळे, बबलू टाक, अर्जून सामाले, शेख रईस शेख हबीब, सागर गंगाळे, नौशीन अलीम कुरेशी, प्राप्ती विकास राजापुरे, सुलोचना मदनराव भालेराव, सपना व्यंकटेश जुक्टे यांची उपस्थिती होती. बैठकीत शहरातील विविध विकासकामांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी सदस्यांनी शहरातील भूमिगत गटार व समांतर पाणीपुरवठा योजनेच्या मंजूर आराखड्याबाबत मुद्दे उपस्थित केले. सदर कामाला सुमारे चार वर्षांपूर्वी मंजुरी मिळालेली असली तरी शहराची वाढलेली व्याप्ती आणि बदललेल्या गरजांचा आहेत.

# हिंगोली जिल्ह्यातील भूकंपाच्या पार्श्वभूमीवर परभणी प्रशासन सतर्क


## परभणी जिल्ह्यात जीवित व वित्तहानी नाही

## नागरिकांनी घाबरु नये, अफवांवर विश्वास ठेवू नये- जिल्हाधिकारी

**परभणी ,/प्रतिनिधी:-** हिंगोली जिल्ह्यात गुरुवारी पहाटे भूकंपाचे एकापाठोपाठ चार धक्के नोंदविण्यात आले. सदर भूकंपाचे धक्के परभणी



जिल्ह्यातील काही भागांमध्येही सौम्य स्वरूपात जाणवल्याबाबत नागरिकांकडून जिल्हा प्रशासनास दूरध्वनीद्वारे माहिती प्राप्त झाली आहे. सध्याच्या घडीला परभणी जिल्ह्यात कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झाल्याची माहिती प्राप्त झालेली नाही. तथापि, जिल्हा प्रशासन परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून असून संबंधित यंत्रणांशी समन्वय साधण्यात येत आहे. दरम्यान, नागरिकांनी घाबरु नये, शांतता राखावी, कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे.




प्राप्त माहितीनुसार, गुरुवारी रात्री १.३७ वाजता हिंगोली जिल्ह्यातील मौजे पांगरा शिंदे, परिसरात ४.६ रिश्टर स्केल तीव्रतेचा पहिला भूकंप झाला. त्यानंतर रात्री २.१५ वाजता ३.६ रिश्टर स्केल, २.१७ वाजता ३.९ रिश्टर स्केल तसेच पहाटे ३.२३ वाजता ४.१ रिश्टर स्केल तीव्रतेचे भूकंपाचे धक्के काकडधाबा (जि. हिंगोली) परिसरात नोंदविण्यात आले. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी परभणी जिल्ह्यातील नागरिकांना शांत राहण्याचे, अफवांवर विश्वास न ठेवण्याचे तसेच कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तात्काळ स्थानिक प्रशासन, पोलीस, महसूल विभाग किंवा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

नागरिकांनी भूकंपानंतर आवश्यक ती खबरदारी घ्यावी. इमारतींमध्ये तडे, इतर संरचनात्मक नुकसान अथवा कोणतीही धोकादायक परिस्थिती आढळल्यास त्याची त्वरित माहिती संबंधित प्रशासनास द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी यावेळी उद्देशून सर्वांसाठी आवाहन त्यांनी केले आहे.

## जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी संरक्षित डीएपी खताच्या ८०० मे.टन साठ्याच्या वितरणास परवानगी

**परभणी,/प्रतिनिधी :** खरीप हंगाम २०२६ च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना डीएपी खताचा पुरेसा पुरवठा उपलब्ध व्हावा यासाठी संरक्षित ठेवण्यात आलेल्या डीएपी खताच्या साठ्याचे वितरण करण्यास जिल्हाधिकाऱ्यांनी परवानगी दिली आहे.

कृषी विभागामार्फत जिल्ह्यासाठी युरिया व डीएपी खताचा संरक्षित साठा महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन, मुंबई आणि महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, नांदेड या नोडल संस्थांमार्फत उपलब्ध करून देण्यात आला होता. जिल्ह्यातील पेरणीची स्थिती आणि शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून हा संरक्षित डीएपी खताचा साठा आता वितरित करण्यात येणार आहे.

तालुकानिहाय डीएपी खताचे वितरण पुढीलप्रमाणे करण्यात येणार आहे : परभणी १०० मे.टन, जिंतूर १०० मे.टन, पाथरी ९० मे.टन, मानवत ९० मे.टन, सेलू ९० मे.टन, सोनपेठ ८० मे.टन, गंगाखेड ९० मे.टन, पालम ८० मे.टन आणि पूर्णा ८० मे.टन. अशा एकूण ८०० मे.टन डीएपी खताचा संरक्षित साठा जिल्ह्यातील नऊ तालुक्यांतील अधिकृत खत विक्रेत्यांकडे उपलब्ध होणार असून तो तात्काळ शेतकऱ्यांना वितरित करण्यात येणार आहे.

सध्या जिल्ह्यात युरिया ९,९८९ मे.टन, डीएपी ४०२ मे.टन, एनपीके १६,३२५ मे.टन आणि एसएसपी ८,४७१ मे.टन इतका रासायनिक खतांचा साठा उपलब्ध असून खताचा पुरेसा पुरवठा असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

खत खरेदी करताना अधिकृत पावती घ्यावी आवश्यक तेवढेच खत खरेदी करावे तसेच अफवा किंवा चुकीच्या माहितीवर विश्वास ठेवू नये, खताचा पुरेसा साठा उपलब्ध असुन घाबरुन अतिरिक्त खरेदी करण्याची आवश्यकता नाही. असे आवाहन जिल्हा कृषी विकास अधिकारी यांनी केले आहे.

जिल्हा प्रशासन आणि कृषी विभागामार्फत खत वितरणावर सातत्याने देखरेख ठेवण्यात येत असून शेतकऱ्यांना सुरळीत व पारदर्शक पद्धतीने खत उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत असल्याची माहिती कृषी विकास अधिकारी, यांनी दिली.

## १२ व १६ जुलैच्या नियोजित फेऱ्यांवर परिणाम

## परिचालन कारणांमुळे पूर्णा-जालना विशेष रेल्वेच्या फेऱ्या रद्द

**परभणी,/प्रतिनिधी-** दक्षिण मध्य रेल्वेने परिचालन विषयक कारणांमुळे पूर्णा-जालना आणि जालना-पूर्णा दरम्यान धावणाऱ्या विशेष रेल्वे गाड्यांची प्रत्येकी एक फेरी रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या मार्गावरील प्रवाशांनी आपल्या प्रवासाचे नियोजन करताना याची नोंद घ्यावी, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.



रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, गाडी क्रमांक ०७०५७ पूर्णा-जालना विशेष ही १२ जुलै २०२६ रोजीची नियोजित फेरी रद्द करण्यात आली आहे. तसेच गाडी क्रमांक ०७०५८ जालना-पूर्णा विशेष ही १६ जुलै २०२६ रोजीची नियोजित फेरीदेखील रद्द करण्यात आली आहे. या निर्णयामुळे संबंधित मार्गावरील प्रवाशांना काही प्रमाणात गैरसोय होण्याची शक्यता असून, त्याबद्दल दक्षिण मध्य रेल्वेने खेद व्यक्त केला आहे. अधिक माहितीसाठी प्रवाशांनी रेल्वे चौकशी सेवा किंवा अधिकृत रेल्वे संकेतस्थळाचा वापर करावा, असे आवाहन दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड मंडळाच्या जनसंपर्क विभागाने केले आहे.

## पूर्णेच्या गट शिक्षणाधिकारीपदी किरण सुरोडवार

**पूर्णा,/प्रतिनिधी-** येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालयात नवीन गटशिक्षणाधिकारी म्हणून किरण संभाजी सुरोडवार यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे. पूर्णा येथील गटशिक्षण कार्यात मागील तीन वर्षापासून कायमस्वरूपी गटशिक्षणाधिकारी नसल्यामुळे येथील गटशिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त कारभार विस्तार अधिकारी बालाजी कापशीकर यांच्याकडे सोपवण्यात आला होता परंतु महाराष्ट्र शासनाने आता पूर्णवेळ कार्यालयाला नवीन शिक्षणाधिकारी नियुक्त केले असून पूर्णेचे गटशिक्षणाधिकारी म्हणून किरण संभाजी सुरोडवार यांनी पदभार स्वीकारला आहे त्यांचे कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या वतीने स्वागत करण्यात आले.





## पत्रकारावरील खोटा गुन्हा मागे घेण्याची मागणी

**सोनपेठ ,/प्रतिनिधी-** बातमी च्या माध्यमातून जगासमोर सत्यता आणून दिल्याबद्दल दैनिक जगमित्र चे संपादक बालासाहेब कडबाने यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथे खोटा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील दाखल झालेला गुन्हा हा बातमीचा आकस मनात धरून खोट्या पद्धतीने दाखल केलेला असून तो तात्काळ मागे घेण्यात यावा. यासाठी बुधवार, दिनांक ८ जुलै रोजी सोनपेठ तालुका पत्रकार संघाच्या वतीने तहसीलदार व पोलीस स्टेशन येथे लेखी निवेदन देण्यात आले. मागील काही दिवसांपूर्वी वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काजी यांच्या भ्रष्टाचार संदर्भात जगमित्र ने एक वृत्त प्रकाशित केले होते. त्याचा आकस मनात धरून काजी यांनी संपादक कडबाने यांच्या विरोधात छत्रपती संभाजीनगर येथील बेगमपुरा पोलीस स्टेशनमध्ये खोटा गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार म्हणजे लोकशाहीची मुस्कटदाबी करणारा असून सदरील खोटा गुन्हा तात्काळ मागे घेण्यात यावा. या मागणीसाठी राज्यातील पत्रकार सरसावले आहेत. त्याचाच भाग म्हणून सोनपेठ येथील मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने निवेदन देण्यात आले. या निवेदनावर शिव मल्हार वाघे, बाबासाहेब गर्जे, भागवत पोपडे, सिद्धेश्वर गिरी, रवींद्र देशमुख, सुभाष सावंत, गजानन चिकणे, किरण स्वामी, राधेश्याम वर्मा, आशिष मुंडे, राजेश्वर खेडकर यांच्या स्वाक्षरी आहेत.

# राष्ट्राचे हरित ऊर्जेचे स्वप्न आणि विरोधकांचा कांगावा

**परभणी,/प्रतिनिधी-:** राष्ट्रीय जैवइंधन धोरण (National Policy on Biofuels)अंतर्गत सरकारने पेट्रोलमध्ये २०% इथेनॉल मिश्रणाचे (२०) धोरण स्वीकारले आहे. इंधनाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टिकोनातून आणि देशाचे परावलंबित्व कमी करून आत्मनिर्भर होण्यासाठी पेट्रोलमध्ये इथेनॉल (E२०) मिश्रित करण्याचे हे धोरण अंगीकारले गेले. या धोरणाबाबत अलीकडे जाणीवपूर्वक वाद निर्माण केला जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला आत्मनिर्भरतेकडे नेण्याचा दृढ संकल्प केला असून त्या दिशेने त्यांची खंबीर पावले पडत आहेत. त्याचवेळी ज्यांनी कायम विकासाचे विधायक राजकारण केले त्या माननीय केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यावरही या मुद्द्यावरून काही लोक टीका करत आहेत. वस्तूतः गडकरीजी केवळ आजच इथेनॉल बद्दल बोलत आहेत असे नव्हे. अनेक वर्षांपासून इथेनॉल, फ्लेक्स-फ्युएल आणि जैवइंधनाचे ते समर्थक आहेत. त्यामागे राष्ट्रहिताची तळमळ आहे. इंधनाच्या बाबतीतले आपले परावलंबित्व कमी व्हावे, देशातल्या शेतकऱ्यांना विकासाच्या प्रक्रियेत सहभागी होता यावे ही त्या मागची भूमिका आहे. सरकारच्या कोणत्याही विकास विषयक उपक्रमांना विरोध करण्याची विरोधी पक्षांची भूमिकाच आहे. आताही (E२०) धोरण पुरेशा तयारीशिवाय राबवले गेल्याचा आरोप केला आहे. पण कोणत्याही उपक्रमाची सुरुवात ही याच पद्धतीने होत असते. विरोधासाठी विरोध करणाऱ्यांना जर विचारात घ्यायचे ठरले तर कोणतीही विकास विषयक कामे राबवली जाऊ शकणार नाहीत.

(E२०) च्या अंमलबजावणीचे प्रमुख उपयोग सांगायचे ठरले तर इथेनॉलमुळे कच्च्या तेलावरील आयात कमी होते.शेतकऱ्यांना ऊस व इतर जैवइंधन पिकांमधून अतिरिक्त बाजारपेठ मिळते.कार्बन उत्सर्जन कमी करण्यास मदत होते. तरीही या मुद्द्यावर सरकारला लक्ष्य का केले जाते याचे कारण हे देशविरोधी षडयंत्रच आहे. कोणत्याही जबाबदार आणि प्रामाणिक नागरिकाने जर विचार केला तर पेट्रोल आयातीवरील भारताचे अवलंबित्व कमी करणे. ऊस, मका इत्यादी पिकांपासून तयार होणाऱ्या इथेनॉलला बाजारपेठ उपलब्ध करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे.



वाहनांमधून होणारे कार्बन उत्सर्जन कमी करणे या गोष्टींना कोणाचा विरोध असल्याचे कारणच नाही.

(E२०) च्या पुढे (उदा. २५ किंवा ३०) जाण्याबाबत अद्याप कोणताही अंतिम निर्णय घेतलेला नसल्याचे पूर्वीच सरकारने स्पष्ट केले. अलीकडेच पेट्रोलियम मंत्र्यांनी २५ सारख्या पुढील टप्प्यांवर जाण्यापूर्वी वाहन उत्पादकांशी सल्लामसलत आणि व्यापक चाचण्या केल्या जातील हे स्पष्ट केले आहे. ही बाब एवढी स्वच्छ असताना त्यावरून संभ्रम निर्माण करण्याचे कोणतेच कारण नाही. काही विरोधकांनी सरकारवर पुरेशा चाचण्या आणि सार्वजनिक चर्चा न करता (E२०) लागू केल्याचा आरोप केला आहे. पर्यावरणाबाबत प्रश्न उपस्थित करणाऱ्यानी ऊसापासून इथेनॉल निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणावर पाणी लागते.अन्नपिकांचा वापर इंधनासाठी वाढल्यास अन्नसुरक्षेवर परिणाम होऊ शकतो.एका पिकावर (विशेषतः ऊसावर) जास्त भर दिल्यास पर्यावरणीय असमतोल निर्माण होऊ शकतो. यासारखे मुद्दे मांडले आहेत. प्रत्यक्षात भारत हा अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण आहे. सध्या अन्नसुरक्षा कायद्यान्वये देशातल्या गोरगरिबांच्या भुकेचा प्रश्न सोडवण्यात सरकार यशस्वी ठरले आहे. इथेनॉलच्या बाबतीत केवळ उसावरच अवलंबून राहण्याचे कारण नाही तर मका व अन्य काही पिकांच्या माध्यमातूनही इथेनॉल निर्मिती होऊ शकते. कोणतेही गैरसमज जाणीवपूर्वक पसरवण्यापेक्षा विरोधकांनी या सर्व बाबी लक्षात घ्यायला हव्यात.

(E२०) सुसंगत वाहनांमध्ये इंजिनला हानी झाल्याचा ठोस पुरावा नाही. उलट कच्च्या तेलाची आयात कमी होणार असल्याने भारताचे परावलंबित्व कमी होणार आहे. शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळणार आहे मुख्य म्हणजे या धोरणाने कार्बन उत्सर्जन कमी करण्यास मदत होणार आहे.

भारत मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल आयात करतो.त्यामुळे दरवर्षी प्रचंड परकीय चलन खर्च होते. इथेनॉलसारख्या देशांतर्गत जैवइंधनामुळे हा खर्च कमी करता येईल हाच दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. ऊस, मका, तुटलेला तांदूळ आणि इतर कृषी उत्पादनांपासून इथेनॉल तयार करता येते. तसे झाले तर शेतकऱ्यांना नक्कीच मोठी बाजारपेठ मिळेल. जेव्हा उसाचे उत्पादन अधिक होते तेव्हा अतिरिक्त गाळपाचा प्रश्न निर्माण होतो आणि शेतकऱ्यांना आपल्या शेतातला उभा ऊस अनेकदा नष्ट करावा लागतो. त्यामुळे भविष्यात उसाखालील लागवडीचे क्षेत्र वाढले तरीही शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होणार नाही. शेतकऱ्यांना अतिरिक्त बाजारपेठ आणि उत्पन्नाचा स्रोत मिळतो. इथेनॉल उद्योगामुळे ग्रामीण भागात नवीन उद्योग, रोजगार आणि गुंतवणूक वाढू शकते.

उसावर आधारित इथेनॉलमुळे पाण्याचा वापर वाढू शकतो. काही वाहनांमध्ये मायलेज कमी होण्याची शक्यता आहे.अन्नपिकांचा इंधनासाठी वापर वाढल्यास अन्नसुरक्षेचे प्रश्न निर्माण होऊ शकतात. यासारखे निरर्थक आरोप सरकारविरुद्ध केले जात आहेत. दिल्लीत निदर्शनेही करण्यात आली. हा केवळ राजकीय विरोधाचा भाग आहे. हरित ऊर्जेच्या माध्यमातून भारत इंधनाच्या बाबतीत आत्मनिर्भर झाला तर अनेकांचे हितसंबंध धोक्यात येणार आहेत. अशा लोकांनीच ही आंदोलने सुरू केली आहेत. किंवा त्यांच्या अदृश्य काही मूठभर लोक विरोध करू लागले आहेत.

देशातल्या प्रामाणिक नागरिकांना इथेनॉल हा भारताच्या ऊर्जा-स्वावलंबनाचा महत्त्वाचा मार्ग वाटतो, सरकारनेही ही बाब गांभीर्याने घेतली आहे. तर टीकाकार त्याच्या या गोष्टीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून नको ते मुद्दे उपस्थित करून भुई थोपटत आहेत.

देशाच्या पायाभूत सुविधांमध्ये क्रांती घडवून आणणाऱ्या धडाडीमुळे देशभर रस्त्यांचे जाळे वाढले आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या माध्यमातून देशातल्या कानाकोपऱ्यापर्यंत रस्ते विकसित झाले आहेत. भारताला आधुनिक आणि विकसित करण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांचे व्हिजन आहे. आज देशातील राष्ट्रीय महामार्गांचे जाळे झपाट्याने वाढले आहे. महामार्ग बांधणीचा वेग दररोज १२ किमीवरून (२०१४ मध्ये) ३० किमी प्रति दिवस इतका वाढवला गेला. भारतमाला योजनेअंतर्गत दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवे, नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग आणि द्वारका एक्सप्रेसवे यांसारखे २७ जागतिक दर्जाचे ॲक्सेस-कंट्रोल एक्सप्रेसवे प्रकल्प मार्गी लागले. रस्ते वाढले त्याचबरोबर वाहनांची संख्या वाढली. देशाची इंधनाची गरज वाढली.

या पायाभूत विकासाबरोबरच शाश्वत विकास आणि हरित ऊर्जा हे आजच्या सरकारचे स्वप्न आहे. पारंपरिक इंधनाला (पेट्रोल-डिझेल) पर्याय शोधण्याच्या आणि आयातीला पर्याय देणाऱ्या तंत्रज्ञानाचे देशातल्या प्रत्येक नागरिकाने स्वागत करायला हवे. सरकारला कोंडीत पकडण्याचे प्रयत्न (E२०) च्या निमित्ताने राजकीय विरोधकांनी आणि काही मूठभर लोकांनी चालवले असले तरी त्यातून केंद्र सरकारच्या प्रतिमेला कोणताच धक्का बसणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील अजोड असे विकास कार्य अवघ्या देशाला माहित असल्याने त्यांनी पाहिलेले हरित ऊर्जेचे स्वप्न हे आज प्रत्येक भारतीयासाठी महत्त्वाचे आहे.

**-श्री.रामकिशन रौंदळे**
भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य

## अग्रलेख

# आरटीओच्या भ्रष्टाचाराचे डोंगर

'आरटीओ' आणि 'भ्रष्टाचार' या जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, असे वाटावे इतकी बेबंदशाही या विभागात दिसते. महाराष्ट्राच्या विविध भागांत लोक हे अनुभवत आहेतच. शिवाय, नागपूर आणि विदर्भातील या परिवहन कार्यालयांतून समोर आलेले अवैध वसुलीचे रॅकेट, चोरीच्या तब्बल १५०० वाहनांची बेकायदेशीर नोंदणी आणि कोट्यवधी रुपयांच्या करचुकवेगिरीचे प्रकार केवळ धक्का देणारे नाही, तर संबंधित व्यवस्थेच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगणारे आहे. विरोधकांनी यासंदर्भात विधानसभेत पुराव्यांसह श्राव्य फिती सादर केल्यानंतर याची गंभीरतेने दखल घेतली गेली. या कथित भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी 'एसआयटी' स्थापन करण्यात आली आहे. खरे तर, या निमित्ताने पुन्हा एकदा सर्वसामान्यांसमोर कायम उभा ठाकणारा जुनाच प्रश्न ऐरणीवर आला आहे. तो म्हणजे, हा विभाग नक्की जनतेच्या सेवेसाठी आहे, की अधिकारी आणि दलालांचे घरे भरण्यासाठी आहे?

खरे तर, 'आरटीओ' विभाग भ्रष्टाचाराच्या शर्यतीत नेहमीच अग्रेसर राहिला आहे, या धाडसी विधानासाठी फार मोठ्या संशोधनाची गरज उरलेली नाही. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वार्षिक अहवालांवर नजर टाकली, तरी महसूल आणि पोलिस खात्याच्या बरोबरीने किंबहुना अनेकदा त्यांच्याही पुढे या विभागाचे नाव येते. लाच घेण्यासोबतच स्वतःची कातडी वाचवण्यासाठी लाच देण्यातही हा विभाग पुढे असल्याचे जाणकार सांगतात. एका अभ्यासानुसार, सीमा तपासणी नाक्यांवर होणारी अवैध वसुली आणि वाहन नोंदणीतील त्रुटींमुळे राज्याच्या तिजोरीला दरवर्षी हजारो कोटी रुपयांचा फटका बसतो. महाराष्ट्रात राहून, कोट्यवधींच्या आलिशान गाड्या मिरवायच्या, त्या दामटायच्या आणि कर चुकवण्यासाठी त्यांची नोंदणी मात्र दमण, दीव किंवा पुद्दुचेरीमध्ये करायची! हा भ्रष्ट खेळ आरटीओ अधिकाऱ्यांच्या अभयाशिवाय आणि आर्थिक तडजोडीशिवाय शक्य आहे का? १५-१५ वर्षे एकाच भागात ठाण मांडून बसलेले अधिकारी अवैध वसुलीचे साम्राज्य उभे करतात, तेव्हा एकूण यंत्रणा काय करीत असते असा प्रश्न सर्वसामान्यांनी विचारू नये का? काही लोक म्हणतात- परिवहन विभागाची सगळी यंत्रणा 'ऑनलाईन' केल्याने दलालांचा संसर्ग संपला आहे. आता सारा कारभार पारदर्शक झाला आहे. मुळात या केवळ वल्गना आहेत. सातत्याने पुढे येणाऱ्या या विभागातील अधिकारी व दलालांच्या भ्रष्ट आचरणातून ते स्पष्ट दिसते. 'डिजिटलायझेशन'च्या नावाखाली कागदावरची यंत्रणा तेवढी बदलली असेलही. पण इथे विविध पदांवर बसलेल्या माणसांची नियत बदललेली नाही. या विभागातून दलाल हद्दपार झाल्याचा दावा केला जातो, पण आज तीच दलाली 'स्मार्ट' बनून पुढे आली आहे. सामान्य माणसाला साध्या परवान्यासाठी किंवा वाहन पासिंगसाठी आजही आरटीओ कार्यालयांचे आणि त्या कार्यालयांसमोर थाटलेल्या दलालांच्या दुकानांचे खेटे घालावे लागतातच, हे वास्तव आहे. एक तर अजूनही सर्वसामान्य माणूस 'ऑनलाईन' अर्ज भरण्याइतपत 'टेक्नोसॅव्ही' झाला नाही आणि झाला असेल, तर नोंदणीची अधिकृत 'साईट' त्याला प्रतिसाद देत नाही! 'ऑनलाईन' यंत्रणेत गैरप्रकार होत नाही, हा अधिकाऱ्यांचा दावा, चोरीच्या १५०० गाड्यांची नोंदणी होत असताना कुठे जातो? कळस म्हणजे, जे काही बोटावर मोजता येईल इतके शिल्लक प्रामाणिक अधिकारी आहेत आणि ज्यांनी या अवैध रॅकेटला विरोध केला, त्यांच्या विरोधात 'ट्रान्सपोर्टर्स'मार्फत खोट्या तक्रारी दाखल केल्या जातात. त्यांना लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात अडकवण्याचा प्रयत्न होतो, हा विधानसभेत झालेला गंभीर आरोप प्रशासकीय दहशतवादाचा प्रकार आहे. अशा भ्रष्टाचारावर प्रभावी उपाय केल्याचा दावा वारंवार होतो. प्रत्येक घोटाळ्यानंतर चौकशी लागते. पण काहीच दिवसांत सारे काही थंड बस्त्यात जाते. पुन्हा कुठेतरी नवा भ्रष्टाचार, नवी 'ऑडिओ क्लिप' आणि नवे वसुलीचे अद्ययावत 'मॉडेल' समोर येते. आयपीएस अधिकारी प्रियांका ननावरे यांच्या नेतृत्वाखालील 'एसआयटी' आता या प्रकरणांची पाळेमुळे खणून काढणार आहे. उच्चस्तरीय चौकशीचे स्वागतच आहे. परंतु, महिनाभरात येणारा त्यांचा अहवाल नेहमीप्रमाणे धूळ खात पडला राहील की, कथित दोषींना थेट तुरुंगाची हवा दाखवण्यासाठी वापरला जाईल, यावर या यंत्रणेची पत ठरणार आहे. एकट्या नागपूर आणि विदर्भ क्षेत्रात गेल्या काही महिन्यांत झालेल्या ८ मोठ्या छाप्यांमध्ये २० पेक्षा जास्त आरटीओ अधिकारी आणि कर्मचारी लाच घेताना रंगेहात पकडले गेले आहेत. हा आकडा फक्त हिमनगाचे टोक आहे. अगदी ताजे उदाहरण बघायचे तर, जून २०२६ मध्ये नागपूर ग्रामीण आरटीओ अंतर्गत येणाऱ्या खुरसापार (महाराष्ट्र-मध्य प्रदेश सीमा) या तपासणी नाक्यावर 'एसीबी'ने छापा टाकला. त्यात, ज्या मोटार वाहन निरीक्षकाने आधी इतर अधिकाऱ्यांविरुद्ध भ्रष्टाचाराची तक्रार केली होती, तोच खाजगी दलालांमार्फत ट्रकचालकांकडून बेकायदेशीर वसुली करताना पकडला गेला! या छाप्यात घटनास्थळावरून सुमारे ४७,००० रुपयांची संशयास्पद रोख रक्कम जप्त करण्यात आली. बाकी किती पैसा कुठे गेला असेल कुणास ठावूक. अशी अनेक उदाहरणे महाराष्ट्र-तेलंगणा (तत्कालीन आंध्रप्रदेश) सीमेवरील लक्कडकोट नाक्यावरही उघडकीस आली आहेत. कारवाया अनेक झाल्यात. पण एकाही दोषी मोटार वाहन निरीक्षकाने पूर्ण शिक्षा भोगली, असे ऐकिवात नाही. इतके खोलवर रुजले आहे हे रॅकेट! किस्से येथे संपत नाहीत. भ्रष्ट अधिकाऱ्यांचा खरा मलिदा 'लक्झरी' गाड्यांच्या करचुकवेगिरीत आहे. महाराष्ट्राच्या रस्त्यांवर धावणाऱ्या कोट्यवधींच्या आलिशान गाड्यांवर दमण-दीव आणि पुद्दुचेरीच्या 'नंबर प्लेट्स' झळकत असतात. महाराष्ट्रातील २० टक्के रस्ता कर चुकवून बोगस कागदपत्रांच्या आधारे अवघ्या अडीच टक्क्यांत या गाड्यांची नोंदणी होते. एका २ कोटींच्या गाडीवर थेट ३० ते ३५ लाख रुपयांचा कर बुडवला जातो. या दरोडेखोरीने राज्याचा हजारो कोटींचा महसूल दरवर्षी बुडतो आणि जनतेच्या या पैशांवर अधिकारी स्वतःची घरे भरतात. दलालांचीही चांदी होते. परिवहन विभागाचा सगळा कारभार 'सारथी' आणि 'वाहन' या ऑनलाईन प्रणालीवर आणल्याचा ढोल तेवढा पिटला जातो. दलाल संपल्याचा दावाही केला जातो. खरेच जर यंत्रणा १०० टक्के ऑनलाईनने सुरक्षित झाली असेल तर देशाच्या विविध भागांतून चोरलेल्या १ हजार ५०० वाहनांची नोंदणी एकट्या नागपुरात कशी काय होते हो...! याचा सरळ अर्थ असा की, चोरांकडे असणारा 'डेटा' आणि आरटीओ अधिकाऱ्यांचे 'लॉगिन आयडी-पासवर्ड' यांचे कुठेतरी साटेलोटे आहे. ऑनलाईन प्रणाली ही पारदर्शकतेसाठी आहे की, या अधिकाऱ्यांनी घरबसल्या 'डिजिटल' स्वाक्षरीने घोटाळे करण्यासाठी आहे? या पृष्ठभूमीवर, आरटीओ यंत्रणेत पारदर्शकता आणण्यासाठी आणि महसूल गळती रोखण्यासाठी परिवहन मंत्रालयाने काही महत्त्वाचे बदल जाहीर केले आहेत. यापुढे महागड्या गाड्यांच्या नोंदणीवेळी बँक लोनची कागदपत्रे, मूळ रहिवासी पुरावा आणि जीएसटी अत्यंत कडक पद्धतीने तपासले जाणार आहे. १ ऑगस्ट २०२६ पासून कोणत्याही व्यावसायिक प्रवासी वाहन चालकासाठी 'बॅज' अनिवार्य करण्यात येणार असून, त्यासाठी संबंधित चालकाकडे स्थानिक नागरिकत्वाचा दाखला आणि व्यावहारिक मराठी भाषेचे ज्ञान असणे बंधनकारक केले जाईल. याउपरही सामान्य नागरिकाला परवान्यासाठी महिनोन्महिने ताटकळत ठेवणारी ही यंत्रणा कोट्यवधींचा कर बुडवणाऱ्या बड्या धेंडांसाठी घातलेल्या पायघड्या मोडेल का? विभागातील अंतर्गत भ्रष्टाचार, सीमा तपासणी नाक्यांवरील बेकायदेशीर वसुली आणि राज्याचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवणाऱ्यांना विभागातून हद्दपार करेल का, हे बघावे लागेल. त्यासाठी आरटीओ अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे दर हा कळीचा मुद्दा. मलिद्याच्या पोस्टिंग त्यावर मिळतात. 'एसआयटी'ला प्रादेशिक परिवहन कार्यालयांतील या भ्रष्टाचाराची खोली मोजणे कितपत जमेल, हेही येणारा काळ सांगेल. एक नक्की सांगता येते आणि ते असे की- प्रामाणिकपणे तपास केला तर भ्रष्टाचाराचे इतके डोंगर उघडे पडतील की ते मोजायला अख्खा शासकीय कर्मचारी वर्ग अपुरा पडेल! ■


## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# किशोरवयीन मुले आणि एआयशी संवाद

आजचे जग कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नव्या पर्वात प्रवेश करत आहे. संगणक, इंटरनेट, स्मार्टफोन आणि समाजमाध्यमांनंतर आता कृत्रिम बुद्धिमत्ता हे मानवी जीवनावर प्रभाव टाकणारे सर्वांत परिवर्तनकारी तंत्रज्ञान ठरत आहे. या तंत्रज्ञानाचा सर्वाधिक जाणवणारा आणि सर्वसामान्यांना सहज उपलब्ध झालेला भाग म्हणजे एआय चॅटबॉट्स. हे संवादक्षम संगणकीय सहायक आज शिक्षण, व्यवसाय, आरोग्य, मनोरंजन, संशोधन आणि वैयक्तिक मार्गदर्शन अशा अनेक क्षेत्रांमध्ये वापरले जात आहेत. मानव हा स्वभावतः संवादप्रिय प्राणी आहे. हजारो वर्षे संवाद हा फक्त मानव ते मानव अशा स्वरूपात घडत होता. परंतु आज प्रथमच इतिहासात मानव आणि यंत्र यांच्यामध्ये नैसर्गिक भाषेत संवाद घडू लागला आहे. विशेष म्हणजे हा संवाद अनेकदा इतका सहज, प्रवाही आणि मानवी वाटतो की समोर प्रत्यक्ष व्यक्ती आहे की कृत्रिम बुद्धिमत्ता याचा विसर पडतो. याच ठिकाणी टीनएज अर्थात किशोरवयीन मुलांच्या सुरक्षिततेचा आणि मानसिक विकासाचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा ठरतो. आजची किशोरवयीन पिढी जन्मापासूनच डिजिटल वातावरणात वाढत आहे. त्यांच्या हातात स्मार्टफोन आहे, त्यांच्या अभ्यासात इंटरनेट आहे आणि त्यांच्या मनोरंजनात डिजिटल माध्यमांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे एआय चॅटबॉट्स त्यांच्यासाठी नवी गोष्ट नसून दैनंदिन जीवनाचा भाग बनत आहेत. अनेक मुले अभ्यासासाठी, माहिती मिळवण्यासाठी, भाषा शिकण्यासाठी, कथा लिहिण्यासाठी किंवा केवळ गप्पा मारण्यासाठी चॅटबॉट्सचा वापर करत आहेत.

योग्य वापर केल्यास एआय चॅटबॉट्स टीनएज मुलांसाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतात. शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. प्रत्येक विद्यार्थ्याची शिकण्याची पद्धत आणि गती वेगळी असते. वर्गात शिक्षकांना सर्व विद्यार्थ्यांकडे समान लक्ष देता येणे नेहमीच शक्य नसते. अशा वेळी एआय चॅटबॉट्स वैयक्तिक मार्गदर्शकाची भूमिका निभावू शकतात.



गणितातील अवघड संकल्पना समजावून सांगणे, विज्ञानातील प्रयोगांचे स्पष्टीकरण देणे, इतिहासातील घटनांचा संदर्भ स्पष्ट करणे किंवा भाषेतील व्याकरण शिकवणे यासाठी हे साधन प्रभावी ठरते. भाषिक कौशल्यांच्या विकासातही चॅटबॉट्स मोठी मदत करू शकतात. इंग्रजीसह विविध परदेशी भाषांचा सराव करण्यासाठी ते उत्तम साथीदार ठरतात. विद्यार्थ्यांना संवाद साधण्याचा आत्मविश्वास मिळतो. लेखन कौशल्य सुधारते. विचार मांडण्याची पद्धत विकसित होते. अनेक वेळा विद्यार्थी वर्गात प्रश्न विचारण्यास संकोच करतात परंतु चॅटबॉटसमोर त्यांना असा संकोच वाटत नाही. सर्जनशीलतेच्या क्षेत्रातही या तंत्रज्ञानाने नवे दरवाजे उघडले आहेत. कथा, कविता, नाटिका, भाषणे, प्रकल्प अहवाल किंवा नवकल्पनांसाठी कल्पना शोधताना चॅटबॉट्स प्रभावी सहकारी ठरतात. विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळते. नव्या दृष्टिकोनातून विचार करण्याची प्रेरणा मिळते. त्यामुळे केवळ माहिती ग्रहण करणारी नव्हे तर सर्जनशील विचार करणारी पिढी घडण्यास मदत होऊ शकते. मानसिक आणि भावनिक पातळीवरही काही सकारात्मक परिणाम दिसून येतात. किशोरवय हा भावनिक चढउतारांचा काळ असतो. अनेक मुलांना आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी योग्य व्यक्ती मिळत नाही. मित्र, कुटुंब किंवा शिक्षक यांच्याशी सर्व गोष्टी बोलणे त्यांना सोपे वाटत नाही. अशा वेळी काही मुले चॅटबॉट्सशी संवाद साधतात. त्यांना वाटते की कोणी तरी त्यांचे म्हणणे ऐकत आहे. त्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात तणाव कमी होण्यास मदत होऊ शकते. मात्र या सर्व फायद्यांबरोबरच काही गंभीर धोकेही समोर येत आहेत. एआय चॅटबॉट्स हे माणूस नसतात. त्यांना भावना नसतात, नैतिक जाणीव नसते, अनुभव नसतो आणि जबाबदारीची जाणीवही नसते. ते केवळ उपलब्ध माहिती आणि प्रशिक्षणाच्या आधारे उत्तरे देतात. त्यामुळे काही वेळा त्यांची उत्तरे दिशाभूल करणारी, अपूर्ण किंवा धोकादायक असू शकतात. अलिकडील काही घटनांनी या धोक्यांची तीव्रता अधोरेखित केली आहे. अमेरिकेत एका किशोरवयीन मुलाच्या आत्महत्येनंतर एआय चॅटबॉट्सच्या सुरक्षिततेविषयी गंभीर चर्चा सुरू झाली. आरोप असे होते की संबंधित मुलगा एका आभासी पात्राशी इतका भावनिकदृष्ट्या जोडला गेला होता की त्याने वास्तव आणि आभासी जगातील सीमारेषा धूसर केल्या. मानसिक संघर्षाच्या काळात त्याला योग्य मानवी आधार मिळाला नाही आणि तो यंत्राशी अधिक संवाद साधत राहिला. ही घटना आपल्याला एक महत्त्वाचा धडा देते. चॅटबॉट्स हे मित्र, पालक, शिक्षक किंवा समुपदेशक यांची जागा घेऊ शकत नाहीत. ते सहायक असू शकतात परंतु ते मानवी नात्यांचा पर्याय असू शकत नाहीत.

एखादे मूल भावनिक संकटात असते, तेव्हा त्याला सहानुभूती, समजूतदारपणा आणि मानवी स्पर्शाची गरज असते. ही गरज कोणतेही यंत्र पूर्ण करू शकत नाही. आणखी एक गंभीर धोका म्हणजे चुकीची माहिती. एआय चॅटबॉट्स अनेकदा आत्मविश्वासाने चुकीची उत्तरे देऊ शकतात. टीनएज मुलांमध्ये माहितीची पडताळणी करण्याची सवय नसल्यास ते अशा उत्तरांवर सहज विश्वास ठेवू शकतात. त्यामुळे डिजिटल साक्षरता आणि चिकित्सक विचारसरणी विकसित करणे अत्यावश्यक बनते. गोपनीयतेचाही प्रश्न तितकाच महत्त्वाचा आहे. अनेक मुले नकळत आपली वैयक्तिक माहिती, छायाचित्रे, आवडी-निवडी किंवा कौटुंबिक माहिती चॅटबॉट्सशी शेअर करतात. ही माहिती भविष्यात कशाप्रकारे वापरली जाईल याची त्यांना कल्पना नसते. त्यामुळे मुलांना माहिती सुरक्षेचे शिक्षण देणे अत्यावश्यक आहे. या पृष्ठभूमीवर तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या कंपन्यांवर मोठी जबाबदारी येते. वयानुसार सुरक्षितता नियंत्रण, संवेदनशील विषयांवरील निर्बंध, आत्महत्येसारख्या संकटाच्या परिस्थितीत त्वरित मदतसेवा सुचवणे, पालक नियंत्रण सुविधा आणि संवादाचे नैतिक परीक्षण यांसारख्या उपाययोजना प्रत्येक एआय प्रणालीत असणे आवश्यक आहे. ■

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**विजय कुळकर्णी**

# काय आहे एफएमजीई परीक्षा?

आपण डॉक्टर व्हावे. आपले व आपल्या कुटुंबाचा समाजात चांगला लौकिक करावा. परिवाराला आर्थिक हातभार लावावा, असे स्वप्न अनेक विद्यार्थी उराशी बाळगून असतात. मात्र, सर्वांचे हे स्वप्न पूर्ण होतेच, असे नाही. कारण, अनेक विद्यार्थ्यांना पात्रता प्रवेश परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण न झाल्यामुळे वैद्यकीय अभ्यासक्रमाला प्रवेश मिळू शकत नाही. वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी असलेली पात्रता प्रवेश परीक्षा उत्तीर्ण करण्यासाठी कमीत कमी १२० गुण आवश्यक असतात. पण, त्या विद्यार्थ्यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळत नाही. असे असले तरी, खाजगी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळू शकतो. पण, त्यासाठी असलेले शैक्षणिक शुल्क भरमसाट असते. अंदाजे १ कोटी रु. लागतात. एवढे पैसे भरण्याची सर्वांचीच आर्थिक परिस्थिती नसते. ज्यांची असते ते पालक आपल्या पाल्यांना खाजगी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश देतात. अशा वेळी काही जण परदेशात वैद्यकीय शिक्षण घेण्याचा सल्ला देतात. रशिया, चीन, युक्रेन, फिलिपिन्स इत्यादी देशांत आपल्या देशातील खाजगी महाविद्यालयांपेक्षा कमी पैशात वैद्यकीय शिक्षण मिळते. आपल्या देशात १ कोटी रु. लागत असतील तर, तिकडे ३० ते ४० लाखांत हे शिक्षण घेऊन एमबीबीएसची पदवी मिळविता येते. पण, असा सल्ला जर कोणी देत असेल आणि आपण त्यानुसार परदेशात जाण्याची तयारी करीत असाल तर, जरा थांबा. कारण, केवळ तिकडची डिग्री घेतली म्हणजे भारतात आपल्याला प्रॅक्टिस करता येईल, असे समजू नका. भारतात प्रॅक्टिस करण्यासाठी एफएमजीई या पात्रता परीक्षेच्या दिव्यातून जावे लागते. आता एफएमजीई ही काय भानगड आहे, असे साहजिकच आपल्या मनात प्रश्न उत्पन्न होईल. तर, एफएमजीई म्हणजे फॉरेन मेडिकल ग्रॅज्युएट एक्झामिनेशन.

परदेशातून एमबीबीएसची पदवी घेऊन येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच ही परीक्षा आहे. म्हणजे, एखाद्या विद्यार्थ्याला वैद्यकीय शिक्षण पात्रता परीक्षेत १२० गुण मिळाले. त्याने भारतातीलच एखाद्या खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातून वैद्यकीय शिक्षणाची पदवी मिळविली असल्यास त्याला अशी कोणतीही परीक्षा न देता प्रॅक्टिस सुरू करता येते. पण, परदेशातून अशी पदवी प्राप्त करून आल्यावर त्या विद्यार्थ्याला एफएमजीई ही परीक्षा द्यावीच लागते. केवळ परीक्षा देऊन भागत नाही तर, ती उत्तीर्ण करावी लागते आणि उत्तीर्ण होण्यासाठी किमान ५० टक्के गुण मिळवावे लागतात. म्हणजे ३०० गुणांच्या पेपरमध्ये किमान १५० गुण प्राप्त झाले तरच तो विद्यार्थी उत्तीर्ण होतो. अन्यथा परदेशातील वैद्यकीय पदवीचा कोणताही उपयोग होत नाही. त्यामुळे एमबीबीएस झाला असला तरी तो विद्यार्थी १२ वी पासच समजला जातो. २००२ साली तत्कालीन सरकारने ही परीक्षा सुरू केली होती. यावर्षी जूनमध्ये ही परीक्षा घेण्यात आली. नुकताच निकालही जाहीर झाला. या परीक्षेला देशभरातून ३७ हजार ४४८ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ३१ हजार ६४५ नापास झाले. त्यातही ४ हजार १५७ विद्यार्थी असे आहेत ज्यांना १४० ते १४९ दरम्यान गुण मिळाले. तर, ६३२ विद्यार्थ्यांना १४९ गुण प्राप्त झाले. त्यामुळे ते नापास झाले. आता या विद्यार्थ्यांना पुन्हा ही परीक्षा द्यावी लागणार आहे. या परीक्षेत विचारण्यात आलेले प्रश्न मास्टर्स म्हणजे एम. डी. अभ्यासक्रमातील होते, असे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. खरं म्हणजे ज्या देशातून या विद्यार्थ्यांनी वैद्यकीय पदवी मिळविली आहे, त्या देशाने त्यांना त्याच देशात प्रॅक्टिस करण्याची परवानगी दिली आहे. आता कोणताही देश आपल्या देशातील नागरिकांच्या जिवाशी खेळणार नाही, हे नक्की. मग, भारतात आल्यावर एवढी कठीण परीक्षा घेण्याचे कारण काय? असा निर्णय घेताना तत्कालीन सरकारच्या मनात काय होते? या प्रश्नांची उत्तरे शोधावी लागणार आहे. यावर्षी घेण्यात आलेल्या परीक्षेचे हॉल तिकीट विद्यार्थ्यांना चार दिवस अगोदर ऑनलाईन पाठविण्यात आले. त्यात केवळ परीक्षा कोणत्या शहरात होणार एवढेच सांगितले होते. विद्यार्थ्यांनी परीक्षा होणाऱ्या ज्या शहरांची नाव दिली होती, त्यापैकी त्यांच्या शहरापासून लांब असलेल्या शहरात त्यांना परीक्षा केंद्र देण्यात आले. कदाचित अलिकडे झालेल्या पेपरफुटीच्या प्रकरणांमुळे असे करण्यात आले असावे. देशांतर्गत वैद्यकीय शिक्षण स्वस्त झाल्यास आपले विद्यार्थी परदेशात वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी जाणारच नाहीत. तेव्हा, सरकारने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. ■

८८०६००६१४९

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# पंजाब काँग्रेसमधील गटबाजीचा दुसरा अंक

पंजाब विधानसभेची निवडणूक अद्याप जाहीर झाली नसताना प्रदेश काँग्रेसमध्ये कलगीतुरा सुरू झाला आहे. निवडणुकीच्या तयारीला लागायच्या आधी काँग्रेस नेतृत्वाची ताकद राज्यातील नेत्यांची मनधरणी करण्यात खर्ची पडत आहे. हा सगळा वाद सुरू झाला, तो अमरिंदरसिंग राजा वडिंग यांना प्रदेश अध्यक्ष पदावर कायम ठेवण्याच्या काँग्रेस नेतृत्वाच्या निर्णयामुळे. माजी मुख्यमंत्री चरणजितसिंग चन्नी यांना प्रदेश अध्यक्ष व्हायचे होते, म्हणजे पंजाब विधानसभेची निवडणूक आपल्या नेतृत्वात लढवायची होती. राज्यातील बहुतांश काँग्रेस नेत्यांचा त्यांना पाठिंबाही होता. या वादावर तोडगा काढण्यासाठी काँग्रेसच्या नेतृत्वाने तीन सदस्यीय समिती पंजाबला पाठवली. अजय माकन, मीनाक्षी नटराजन आणि भजनलाल यादव यांच्या समितीने राज्यातील सर्व स्तरावरील काँग्रेस नेत्यांशी चर्चा करीत अमरिंदरसिंग राजा वडिंग यांना हटवत चन्नी यांना प्रदेश अध्यक्ष करण्याची शिफारस केली. मात्र, काँग्रेसच्या नेतृत्वाने ही शिफारस फेटाळून लावत अमरिंदरसिंग यांना अध्यक्ष पदावर कायम ठेवण्याचा निर्णय घेत चन्नी यांची प्रदेश प्रचार समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली.

येथून वाद चिघळला. चन्नी गटाने बंडखोरीचे निशाण फडकवले. अध्यक्ष नाही तर चन्नी यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करा, अशी मागणी त्यांच्या गटातर्फे करण्यात आली. पक्षांतर्गत गटबाजी टाळण्यासाठी सामूहिक नेतृत्वाच्या आधारावर विधानसभा निवडणूक लढवायची काँग्रेस नेतृत्वाची भूमिका होती. विशेष म्हणजे प्रदेश अध्यक्ष अमरिंदरसिंग राजा वडिंग यांनी मुख्यमंत्रिपदाच्या वादापासून स्वतःला दूर ठेवले. चन्नी वा अन्य कोणताही काँग्रेस नेता मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत राहू शकतो, पण मी त्या शर्यतीत नाही. राहुल गांधी ज्याला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करतील, त्याच्यासोबत मी उभा राहील, अशी संयमित प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

राज्यातील परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे लक्षात आल्यावर काँग्रेसच्या नेतृत्वाने डॅमेज कंट्रोलसाठी प्रदेश प्रभारी भूपेश बघेल यांना तातडीने पंजाबमध्ये पाठवले. पण चन्नी गटाने त्यांच्याशी चर्चा न करता दिल्ली गाठली आणि आम्ही फक्त काँग्रेसच्या नेतृत्वाशीच चर्चा करू, अशी भूमिका घेतली. या वादात काँग्रेस नेते मनीष तिवारी यांच्या नाराजीचे वेगळे उपकथानकही आहे. राज्यातील निवडणूक समितीत स्थान न मिळाल्यामुळे तिवारी यांनी समाजमाध्यमातून आपली नाराजी व्यक्त केली.


पंजाब काँग्रेसला तसाही गटबाजीचा शाप आहे. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीच्या आधीही पंजाब काँग्रेसमध्ये वाद झाला होता, त्यावेळी वादाचा केंद्रबिंदू अमरिंदरसिंग होते; आणि योगायोग म्हणजे २०२६ मध्येही प्रदेश काँग्रेसमध्ये जो वाद सुरू आहे, त्या वादाचा केंद्रबिंदूही अमरिंदरसिंग आहेत. फरक म्हणजे त्यावेळचे अमरिंदरसिंग कॅप्टन होते आणि आताचे अमरिंदरसिंग राजा वडिंग आहेत.

२०२६ मध्ये चरणजितसिंग चन्नी आणि अमरिंदरसिंग राजा वडिंग यांच्यात जसा वाद सुरू आहे, तसाच २०२२ मध्ये कॅप्टन अमरिंदरसिंग आणि नवज्योतसिंग सिद्धू यांच्यात सुरू झाला होता. २०१७ ची निवडणूक काँग्रेसने जिंकली आणि कॅप्टन अमरिंदरसिंग मुख्यमंत्री झाले. २०१७ ची निवडणूक आपली शेवटची निवडणूक आहे, यानंतरही आपण निवडणूक लढणार नाही, असा भावनिक प्रचार तेव्हा कॅप्टन अमरिंदरसिंग यांनी केला होता. त्यामुळे काँग्रेसला बहुमत मिळाल्यानंतर कॅप्टन मुख्यमंत्री झाले. २०१७ च्या विधानसभा निवडणुकीच्या आधी सिद्धू यांनी भाजप सोडून काँग्रेसमध्ये प्रवेश केला. सिद्धू हे राज्यातील काँग्रेसचे भविष्य असल्याची प्रतिक्रिया तेव्हा प्रदेश प्रभारी असलेले हरीश रावत यांनी व्यक्त केली होती; पण याच सिद्धूंनी नंतर राज्यातील काँग्रेसचे भविष्य अंधकारमय केले. काँग्रेसच्या नेतृत्वालाही तेव्हा सिद्धू यांच्याकडून खूप अपेक्षा होत्या. कॅप्टन अमरिंदरसिंग यांच्या मंत्रिमंडळात सिद्धू यांचा समावेश झाला, पण या दोघांचे काही जमले नाही. कॅप्टन अमरिंदरसिंग आणि नवज्योतसिंग सिद्धू यांच्यात वाद नाही तर संघर्ष सुरू झाला. त्यामुळे काँग्रेसच्या नेतृत्वाने कॅप्टन अमरिंदरसिंग यांनी मुख्यमंत्रिपदावरून हटवत त्यांच्या जागेवर चरणजितसिंग चन्नी यांना मुख्यमंत्री केले. एवढेच नाही तर सुनील जाखड यांना प्रदेश अध्यक्ष बनवले. मात्र, सिद्धू यांचे समाधान झाले नाही. मुख्यमंत्रिपदावर डोळा असलेल्या सिद्धू यांचे नंतर चन्नी यांच्याशीही पटले नाही, दोघांतील संबंध तणावपूर्ण झाले. त्याची परिणती राज्यातील काँग्रेसच्या सत्ता गमावण्यात झाली. विशेष म्हणजे मुख्यमंत्रिपद गमावल्यामुळे कॅप्टन अमरिंदरसिंग यांनी काँग्रेस सोडत आधी आपला वेगळा पक्ष स्थापन केला आणि नंतर भाजपात प्रवेश केला, तर नवज्योतसिंग सिद्धू यांनी आधी काँग्रेस आणि राजकारणही सोडले. आज सिद्धू कुठे आहे, हे कोणालाही माहीत नाही. कॅप्टन अमरिंदरसिंग आणि सिद्धू यांच्यात वाद सुरू होता, तेव्हा सुनील जाखड प्रदेश काँग्रेस अध्यक्ष होते. काही दिवसांनी सुनील जाखड यांनीही काँग्रेसला कंटाळून भाजपात प्रवेश केला. आताआतापर्यंत सुनील जाखड पंजाब भाजपाचे अध्यक्ष होते. पंजाब काँग्रेसमध्ये जेव्हा जेव्हा वाद झाला, त्याचा फायदा भाजपाला झाला आहे. यावेळी पंजाब भाजपा अध्यक्षांनी चरणजितसिंग चन्नी यांना भाजपात येण्याचे निमंत्रण देऊन टाकले. दुसरीकडे पंजाब काँग्रेसचे नेते सुखजिंदरसिंह रंधावा यांनी गृहमंत्री अमित शाह यांची नुकतीच भेट घेतल्यामुळे वेगळी चर्चा सुरू झाली आहे. पंजाब प्रदेश काँग्रेसमधील ताज्या पेचप्रसंगांची परिणती अखेर कशात होणार, हे आताच सांगता येणार नाही. या वादात अमरिंदरसिंग राजा वडिंग यांचा बळी जाणार की चरणजितसिंग चन्नी माघार घेणार, हे आताच सांगता येणार नाही. मात्र एक नक्की आहे, याचा फटका काँग्रेसला बसणार! राज्यात तशीही काँग्रेस सत्तेवर येण्याची शक्यता नाहीच्या बरोबर आहे. काँग्रेसची यात दुहेरी गोची आहे. काँग्रेस चन्नी यांच्यावर कोणतीही कारवाई करू शकत नाही. कारण चन्नी हे राज्यातील दलित नेते आहेत आणि पंजाबमध्ये दलित मतदारांची संख्या ३० ते ३५ टक्के आहे. चन्नी यांच्यावर कोणतीही कारवाई केली तर दलितांची नाराजी काँग्रेसला ओढवून घ्यावी लागेल; जी काँग्रेसला परवडणारी नाही. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर काँग्रेसने अमरिंदरसिंग राजा वडिंग यांना प्रदेश अध्यक्ष बनवले. आपल्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात अमरिंदरसिंग यांनी काँग्रेसला लोकसभा निवडणुकीत चांगले यश मिळवून दिले. त्यामुळे राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांना हटवणे काँग्रेसच्या नेतृत्वाला योग्य वाटले नाही, त्यामुळे त्यांना अध्यक्षपदावार कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. २०२२ मध्ये काँग्रेसच्या राज्यातील पराभवाची पटकथा सिद्धू यांनी लिहिली, यावेळी त्या भूमिकेत चरणजितसिंग चन्नी आहेत. पंजाबमध्ये काँग्रेसला पराभूत करण्यात भाजपाला फारसे कष्ट घ्यावे लागणार नाही, भाजपाची ही जबाबदारी राज्यातील काँग्रेसच्या नेत्यांनी आपल्या शिरावर घेतली आहे आणि ती ते प्रामाणिकपणे पार पाडतील, यात शंका नाही. पंजाब काँग्रेसच्या नेत्यांनी राजकीय आत्महत्या करण्याचे ठरविले असेल तर त्याला कोणी कसे काय रोखू शकणार? ■

९८८१७१७८१७

### समाधान, शांती आणि आरोग्य...

मानवी जीवनात सुख, समाधान आणि मानसिक शांतता यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. आजचा माणूस सुखाच्या शोधात सतत धावत आहे. अधिक पैसा, मोठे घर, महागड्या वस्तू यांनाच सुख समजले जाते. परंतु खरे सुख साधेपणात आणि समाधानात दडलेले असते. साधे जीवन जगणारा माणूस आनंदी, निरोगी आणि शांत राहतो. अनेक थोर व्यक्तींनी साधेपणाने जीवन जगून समाजाला आदर्श घालून दिला. साधे जीवन म्हणजे गरजा मर्यादित ठेवणे, अनावश्यक खर्च टाळणे आणि प्रामाणिकपणे जीवन जगणे. साध्या जीवनामुळे मनावर ताण कमी येतो. कमी अपेक्षा ठेवल्यास माणूस जे आहे त्यात समाधान मानतो. त्यामुळे मानसिक शांती मिळते. नियमित दिनचर्या, साधा आहार आणि व्यायाम यामुळे शरीर निरोगी राहते. माणसामध्ये नम्रता, प्रामाणिकपणा, सहकार्य आणि प्रेम या गुणांचा विकास होतो. तो इतरांना मदत करण्यासही नेहमी तयार असतो. त्यामुळे समाजातही चांगले संबंध निर्माण होतात. साधेपणाने जगणारी व्यक्ती निसर्गाच्या सान्निध्यात, कुटुंबाच्या प्रेमात आणि



चांगल्या नातेसंबंधांत खरे समाधान शोधते. प्रत्येकाने आपल्या जीवनात साधेपणाचा स्वीकार करावा.

साधेपणामुळे माणूस इतरांच्या दुःखाची जाणीव ठेवतो, समाजाशी जोडला जातो आणि पर्यावरणाचेही संरक्षण करण्यास हातभार लावतो. साधेपणा हा जीवनातील खरा आनंद आणि समाधान मिळवून देणारा मार्ग आहे. तो आपल्याला स्वार्थ, दिखाऊपणा आणि अनावश्यक स्पर्धेपासून दूर ठेवतो. शेवटी असे म्हणता येईल की, खरे सुख संपत्तीत नसून समाधानात असते. साधेपणा, प्रामाणिकपणा आणि सकारात्मक विचार यांच्या आधारावर जगलेले जीवन खऱ्या अर्थाने सुखी आणि समाधानी असते. साधे जीवन जगून उच्च विचार जोपासल्यास वैयक्तिक तसेच सामाजिक जीवन अधिक आनंदी, शांत आणि निरोगी होईल.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

## वाचक पत्रे

### लोकप्रतिनिधींनी कायद्याचा आदर करावा

कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या डॉक्टर व परिचारिकांना एका नगरसेवकाने बेदम मारहाण केल्याची बातमी वाचण्यात आली. नगरसेवकाने डॉक्टर व परिचारिकांना मारहाण करतानाचा व्हिडीओ देखील समाज माध्यमात व्हायरल झाला आहे. डॉक्टर आणि परिचारिकांना मारहाण करण्याची नगरसेवकाची कृती चुकीचीच आहे. डॉक्टर असो की परिचारिका, अधिकारी असो की कर्मचारी जर चुकीचे वागत असतील तर लोकप्रतिनिधींनी त्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करावी. त्यांची तक्रार वरिष्ठांकडे किंवा मुख्यमंत्र्यांकडे करावी. अधिकाऱ्यांना अशाप्रकारे अपमानित करणे, मारहाण करणे लोकप्रतिनिधींना शोभत नाही. लोकप्रतिनिधीच कायदा हातात घेऊ लागले तर देशात अराजकता माजेल. अधिकारी आणि लोकप्रतिनिधी ही लोकशाहीच्या रथाची दोन चाके आहेत. ती सोबत चालली तरच लोकशाहीचा रथ पुढे ओढता येईल याचे भान दोघांनीही ठेवायला हवे.

**श्याम ठाणेदार**/पुणे. ९९२२५४६२९५

■■■

### प्रदूषण टाळा, नद्या वाचवा

भारतात अनेक नद्या आहेत. नद्या जीवनदायिनी आहेत. प्राचीन काळी नद्यांच्या काठानेच मनुष्याने वस्ती वसवली. मनुष्य, प्राणी, पक्षी यांचे जीवन या नद्यांच्या जलावर अवलंबून आहे. पण भारतात पवित्र मानल्या जाणाऱ्या या नद्या आज प्रदूषित झाल्या आहेत आणि याला मनुष्यच कारणीभूत आहे. जलप्रदूषणाच्या अनेक कारणांपैकी औद्योगिक सांडपाणी मुख्यत्वे आहे. मोठे उद्योग, कारखाने यातील रासायनिक पाणी, कचरा नदीत सोडला जातो. तसेच घरगुती कचरा, प्लास्टिक इत्यादी गोष्टींमुळे सुद्धा जलप्रदूषण होते. त्याचप्रमाणे हल्ली शेतीसाठी पिकांवर रासायनिक फवारणी केली जाते, त्यामुळे सुद्धा नद्यांचे पाणी प्रदूषित होते. काही ठिकाणी नदीकाठी कपडे धुतले जातात, त्यातील डिटर्जंटने जलप्रदूषण होते. नदीतील जल प्रदूषित झाल्यास त्याच्या वापरामुळे मनुष्याच्या व प्राण्यांच्या आरोग्यावर त्याचा गंभीर परिणाम होतो. प्रदूषित गढूळ पाणी प्यायल्याने कॉलरा, कॅन्सर, त्वचाविकार, श्वसनाचे विकार मनुष्याला होतात. तर प्राणी सुद्धा याला बळी पडतात. पाण्यात रसायने जमा झाल्याने शेवाळाची वाढ होते. त्यामुळे पाण्यातील ऑक्सिजन कमी होतो. त्याचा गंभीर परिणाम जलचरांवर होतो. ज्या पाण्याशिवाय आपण एक क्षणही राहू शकत नाही त्याबद्दल आपली उदासीनता नव्हे कृतघ्नपणा यावरून दिसून येतो. यावर उपाय म्हणून कारखान्यांच्या सांडपाण्यातील विषारी घटक कमी करणे, पर्यावरणपूरक उत्पादने वापरणे, कीटकनाशकांऐवजी जैविक खते वापरणे. यामुळे काही प्रमाणात का होईना प्रदूषण कमी होईल. ■

**माधवी पत्की**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
**tbedit2016@gmail.com**

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेसाठी नोंदणी सुरू; ३१ जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ९ जुलै : जिल्ह्यातील शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये इयत्ता पाचवीमध्ये शिकत असलेल्या आणि ज्यांचा जन्म १ मे २०१५ ते ३१ जुलै २०१७ या दरम्यान झाला आहे,

अशा पात्र विद्यार्थ्यांसाठी जवाहर नवोदय विद्यालय इयत्ता सहावी प्रवेश परीक्षेची नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. ही परीक्षा २८ नोव्हेंबर २०२६ रोजी घेतली जाणार आहे.

या परीक्षेसाठी ऑनलाईन पद्धतीने फॉर्म भरण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ असून इच्छुक व पात्र उमेदवारांनी HTTP://NAVODAYA.GOV.IN या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन आपले अर्ज मुदतीत सादर करावेत, असे आवाहन लातूर येथील जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्राचार्यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.



# विविध वृत्त....

## बुद्ध विहाराला मिळाला तीर्थ क्षेत्राचा 'क' दर्जा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ९ जुलै : शहरातील बालाजीनगर भागात असलेल्या राजा शुद्धोधन बुद्ध विहाराला तीर्थ क्षेत्राचा 'क' दर्जा प्राप्त झाला असून राजा शुद्धोधन बुद्ध विहार हे तीर्थ क्षेत्राचा दर्जा प्राप्त करणारे पहिलेच बुद्ध विहार ठरले आहे.

लातूर शहर गजबजलेल्या ठिकाणी मोठी जागा, झाडांची हिरवळ आणि बुद्ध विहाराची विस्तारीत सुंदर इमारत या ठिकाणी आहे. या बुद्ध विहारात विविध सामाजिक उपक्रम आणि धार्मिक कार्यक्रम घेतले जातात. या बुद्ध विहारच्या विश्र्वस्तांनी प्रशासनाकडे पाठपुरावा केल्याने या बुद्ध विहाराला तीर्थ क्षेत्राचा 'क' दर्जा प्राप्त झाला असून येत्या काळात पूर्व भागातील विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज अभ्यासिका देखील याच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असल्याचे बुद्ध विहारच्या विश्र्वस्तांनी सांगीतले.

## होमगार्डच्या सतर्कतेमुळे मोबाईल परत मिळाला

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ९ जुलै : होमगार्ड मनोजदादा लोटे से दि. ३ जुलै रोजी शहरातील कळा नाका टे कन्हेरी बैंक, राजीव गांधी चौक प्रवास करत असताना त्यांना रस्त्यामध्ये एक विवो कंपनीचा नवीन मोबाईल पडलेला दिसला. तो मोबाईल घेऊन पोलीस स्टेशनला वावे या उद्देशाने त्यांनी गाडी वळवली वेवळात एका अनोळखी व्यक्ती तो मोबाईल उबलून आणि मोबाईल माझा आहे, असे सांगीतले, व्यावेळी होमगार्ट लोटे यांनी व्याची खोलवर वैक्की केली असता तो मोबाईल त्याचा नसल्याचे निदर्शनास आले. लावेळी लोटे यांनी त्या इसमास मी होमगार्ड आहे, असे सांगतच त्या इसमाने मोबाईल होमगार्ड लोंढे यांना देऊन निघून गेला, लोंढे यांनी सदर मोबाईल विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात जाऊन गोबाईल जमा केला. तेवढचात मोबाईल मालकावा त्या मोबाईलवर कॉल आला. तेव्हा विवेकानंद पोलीस ठाण्यात येऊन मोबाईल घेऊन जा, असा निरोप दिला. मोबाईलवा मालकाने पोलीस दाण्यात येऊन मोबाईल येऊन गेला, कर्तव्यदक्ष होमनाई लोटे यांच्यामुळे हखलेला मोबाईल गुळ मालकास परत मिळाला.

## रेल्वे स्थानकात बालकांना दिली पोलिओची मात्रा



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ९ जुलै : शहरामध्ये रविवार दि. २८ जून रोजी पल्स पोलिओ लसीकरण मोहिम राबविण्यात येत आहे. या दिवशी ५ त्यांच्या आतील ४२,८२३ बालकांना पोलिओची लस पाजण्यात आली. यासाठी शहरामध्ये एकूण २४० पोलिओ लसीकरण केंदाच्या ठिकाणी लसीकरणाची सोय उपलब्ध करुन देण्यात आली होती. त्याअंतर्गत रेल्वे स्थानक येथे देन लाभार्थ्यांना पोलिओ डोस देण्यात आला, याचेची आरोग्य निरीक्षक पाटील, आरोग्य कर्मचारी सारगे व ऋतुन्रा उपस्थित होते.

## रो.क्लब लातूर मेट्रोच्या अध्यक्षपदी कोळी

लातूर : रोटरी क्लब लातूर मेट्रोचा २०२६-२० या वर्षासाठीचा २६ वा पदग्रहण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात आणि दिमाखात पार पडला. यावेळी रोटेरियन विजय कोळी यांनी अध्यक्षच्यानी, सुर्यवंशी यांनी सचिवपदांची, बेडके यांनी सह सचिवपदाची सूत्रे स्वीकारली.

# विद्यार्थ्यांनी जीवनात नीतीमूल्य, संस्कारास प्राधान्य द्यावे : जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ९ जुलै : जीवनात सर्वांगीण प्रगतीच्या उद्दिष्ट्यपूर्तीसाठी विद्यार्थ्यांनी नीती मूल्ये, संस्कारास प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले.

लातूर येथील अभिनव मानव विकास संस्था द्वारा संचालित श्रीकिशन सोमाणी विद्यालयात आयोजित दहावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. भारत बास्टेवाड बोलत होते. याप्रसंगी संस्था अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर, कोषाध्यक्ष जयेश बजाज, सहसचिव सुभाष कासले, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी अनेक क्षेत्र खुली असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी केवळ अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय क्षेत्राकडे वळण्याऐवजी क्रीडा, कलेच्या क्षेत्राकडे वळण्याचा विचार करावा. यशासाठी कठोर परिश्रम, सातत्याची नितांत आवश्यकता असते. त्यामुळे प्रसंगी अपयशाने खचून न जाता सकारात्मक विचार करून प्रगतीपथाकडे वाटचाल करावी असे सांगून डॉ. बास्टेवाड यांनी विद्यार्थ्यांना आपल्या मराठी भाषेचा अभिमान बाळगा, ज्या शाळेत शिकलो तेथून नेमके काय घेतले याचा नेहमीच विचार करत रहा असेही मार्गदर्शन केले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा यांनी यावेळी बोलताना संस्थेच्या प्रगतीचा आलेख संक्षिप्त स्वरूपात मांडला. विद्यालयात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच बौद्धिक विकासावरही भर दिला गेल्याने सक्षम, निपुण विद्यार्थी तयार होत आहेत. पाठ्यपुस्तकातील ज्ञानाबरोबरच विद्यार्थी बहुश्रुत होत असल्याचे त्यांनी सांगितले.

शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर यांनी आपल्या मनोगतात यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन महाविद्यालयीन शिक्षणाचा ताण घेऊ नका. ताण घालविण्यासाठी छंद जोपासा असा मौलिक सल्ला दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी या उपक्रमाच्या आयोजनामागची पार्श्र्वभूमी विशद केली. शालेय जीवनात केवळ गुण संपादन करणे महत्वाचे नाही, तर खेळ, वाचन,चित्र, संगीताचाही अनुभव घेतला पाहिजे यासाठीही विद्यालय सतत प्रयत्नशील असते,असेही ते म्हणाले.

यावेळी दहावी परीक्षेतील गुणवंत, शिष्यवृत्ती परीक्षेतील यशस्वी शंभर विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

तसेच सायन्स ऑलिंपियाड तर्फे दिल्या गेलेल्या उत्तम प्राचार्य पुरस्काराबद्दल मुख्याध्यापक रमाकांत स्वामी तसेच आंतरराष्ट्रीय कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये यशस्वी सहभाग घेतलेले संस्थेचे सदस्य संजीव भार्गव यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तनुजा देशपांडे यांनी तर संस्थेचे सचिव कमलकिशोर अग्रवाल यांनी आभार प्रदर्शन केले .

## १५० सायकल स्वार निघाले विठ्ठू रायाच्या दर्शनाला

तभा वृत्तसेवा




लातूर दि. ९ जुलै : शहारातील लातूर सायकलिस्ट क्लब च्या वतीने१५० सायकल स्वार पंढरपूर कडे उद्या निघणार असून तेथे विठ्ठरायाचे दर्शन घेणार आहेत .

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी . झाडे लावा, पर्यावरण वाचवा हे घोषवाक्य ठेवण्यात आले आतून सायकल स्वारांचा प्रवास तीन टप्प्यात होणार आहे .

उद्या पहाटे तीन वाजता क्रीडा संकूल येथून सायकल स्वार प्रस्थान करतील . बाळे - सोलापूर पहिला मुक्काम असून यावेळी भजन संध्या आयोजित करण्यात आली आहे . शनिवारी पहाटे पाच वाजता हे सायकल स्वार पंढरपूर कडे मंगळवेढा मार्ग मार्गस्थ होईल . सायंकाळी माचनूर येथे दुसरा मुक्काम होईल . दुसऱ्या दिवशी हे सायकल स्वार पंढरपूर येथील भक्तनिवास येथे आगमन होईल . रविवारी सकाळी नगर प्रदक्षिणा तसेच सायकल रिंगण सोहळा होणार आहे . त्यानंतर महाप्रसाद घेऊन सायकल स्वार बसनी लातूरकडे परतीचा प्रवास करतील

ही सायकल स्वार शिस्तबद्ध आणि यशस्वी करण्यासाठी क्लबचे अध्यक्ष श्रीराम येलगटे, उपाध्यक्ष विकास कातपुरे, सतिश खोबरे, शाम शेटे, विवेक नरहरे, श्रीरंग मद्रेवार हे विशेष मेहनत घेत आहेत

## पारदर्शक 'नीट' परीक्षेसाठी त्रिसदस्यीय समिती स्थापन करा



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ९ जुलै : 'नीट'च्या पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान झाले. भविष्यात गुणवंत विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ नये याकरिता 'त्रिस्तरीय परीक्षा प्रणाली' लागू करण्याची मागणी शिक्षणतज्ज्ञ रमेश बिराजदार यांनी केली आहे.

याकरिता त्यांनी थेट केंद्रीय शिक्षणमंत्री तसेच एनटीए च्या सदस्यांना पत्रव्यवहार केला आहे. या परीक्षा प्रणालीमध्ये इयत्ता १० वीचे ५०, १२ वी बोर्डासाठी ५० आणि 'एनटीए' परिक्षेसाठी १०० गुण असे एकूण २०० गुणांचे वर्गीकरण असावे. त्याचबरोबर एनटीए परिक्षेसाठी १० वी, १२ वी दोन्ही बोर्ड परीक्षेत किमान ९० टक्के गुणांची अट अनिवार्य करावी. तसेच ही परीक्षा बायोमेट्रिक आणि ऑनलाईन पारदर्शता येण्यासाठी १० हजार प्रश्र्नांमधून 'रँडम' पद्धतीने प्रत्येक विद्यार्थ्याला संगणकावर वेगळा प्रश्र्न विचारण्यात यावा, अशी मागणी बिराजदार यांनी केली आहे.

## अनुपस्थित अधिकाऱ्यांवर कारवाई करा विशेष सर्वसाधारण सभेत सदस्यांची मागणी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ९ जुलै : लातूर जिल्हा परिषदेच्या प्रत्येक सभेला विविध विभागांना उपस्थित राहण्याच्या संदर्भाने कळवले जाते. पण सदर विभाग हा विषय गांभीर्याने घेत नसल्याने सभेला अनुपस्थित राहणाऱ्या अधिकाऱ्यांवर आपल्या अधिकाराचा वापर करून कारवाई करावी, अशी अग्रही मागणी सभागृहाचे गटनेते, सदस्य यांनी लावून धरल्याने अध्यक्षा उषाताई पाटील यांनी कारवाई करण्याचे आदेश दिले.

लातूर जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभाग्रहात जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा उषा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंगळावारी सर्वसाधारण सभा पार पडली. या सभेस उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, सभापती, अधिकारी व विविध विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

लातूर जिल्हा परिषदेच्या पहिल्या विशेष सर्वसाधरण सभेस ३४ पैकी १८ विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तर १६ अधिकारी अनुपस्थित होते. सभागृहाचे कामकाज सुरू होताच काँग्रेसच्या गट नेत्या आशाताई भिसे यांनी आजच्या सभेस किती अधिकारी उपस्थित आहेत,

सभागृहाला अवगत करावे, असे सांगताच सचिवांनी उपस्थिती घेतली असता यात पशुसंवर्धन उपायुक्त, मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्त, जिल्हा उपनिबंधक, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, लातूर, निलंगा, उदगीर, पीएमजीसीवायचे कार्यकारी अभियंता, स्व. विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता, पोलिस उपअधीक्षक, इतर मागास बहूजन कल्याण विभागचे सहाय्यक संचालक, समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त, महावितरणचे अधिक्षक अभियंता, महाउर्जाचे विभागीय महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक, प्रादेशिक परिवहन अधिकारी, दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, लातूर आगार व्यवस्थापक, अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त, शिक्षण उपसंचालक, लिड बँकेचे मॅनेजर, कामगार सहाय्यक आयुक्त अनुपस्थित होते. या अनुपस्थित अधिकाऱ्यांच्या वरिष्ठांना माहिती कळवून प्रशासकीय कार्यवाही करावी, असे कळवले जाणार असल्याची माहिती जि. प. प्रशासनाने दिली.

## रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या वाहन चालकावर गुन्हा दाखल




तभा वृत्तसेवा

लातूर दि. ९ जुलै : शहरातील दादोजी कोंडदेवनगरच्या पश्र्चिमेला छोटा हत्तीमधुन कचरा टाकल्यामुळे वाहन एमएच-२४, बीडब्ल्यू-१०२६ या क्रमांकाच्या वाहनावरील चालकाविरुद्ध एमआयडीसी पोलीस स्टेशनला गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

लातूर शहर महानगरपालिका आयुक्त राहुल कुलकर्णी व उपायुक्त वसुधा फड यांच्या आदेशावरून, मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे यांच्या सुचनेनुसार, मुख्यमहानगरपालिका, स्वच्छता निरीक्षक रवि कांबळे, स्वच्छता निरीक्षक शिवाजी कु टकर यांनी सदर गुन्हा दाखल केला आहे.

शहर स्वच्छतेसाठी सर्वांनी सहकार्य करावे. आपल्या घरातील व दुकानातील कचरा घंटागाडीत कचरा द्यावा. रस्त्यावर किंवा उघड्या जागेत कचरा टाकू नये अन्यथा दंडात्मक कार्यवाही करुन गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा महानगरपालिका प्रशासनाने दिला आहे.


## लातूर शहरातून निघणार श्री जगन्नाथांचा रथ

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ९ जुलै : आंतरराष्ट्रीय श्रीकृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) लातूर आणि श्री जगन्नाथ धाम मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी दि. १६ जुलै रोजी श्री जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन करण्यात आले असून इस्कॉन लातूरकडून त्याची जय्यत तयारी सुरू आहे.

चार धाम पैकी एक धाम असलेल्या जगन्नाथ पुरीमध्ये १६ जुलै रोजी जगन्नाथ रथयात्रा आह आणि त्याच दिवशी लातूर शहरामध्येदेखील इस्कॉन लातूरच्या वतीने ही रथयात्रा होत आहे. भगवान जगन्नाथ बलदेव आणि सुभद्रा रथावर विराजमान होऊन संपूर्ण लातूरवाशींना दर्शन

देणार आहेत. १६ जुलै रोजी दुपारी २ वाजता मध्यवर्ती बस स्थानकाच्या पाठीमागील अंबिका मंदिर येथून



रथयात्रेला सुरुवात होऊन सुभाष चौक, भुसार लाईन, गंजगोलाई, सराफ लाईन, गुळ मार्केट, छत्रपती शिवाजी महाराज चौक, राजीव गांधी चौक या मार्गे सर्वांना दर्शन देत जवळच जगन्नाथ मंगल कार्यालय या ठिकाणी या रथयात्रेचा समारोप होणार आ-हे.

यावेळी देश-विदेशातील हजारो वैष्णव भक्तांच्या उपस्थितीमध्ये हरिनाम संकीर्तन, ग्रंथ वितरण, प्रसाद वितरण करण्यात येणार असून समारोपाच्या ठिकाणी विशेष प्रवचन, महाआरती आणि सर्वांसाठी भोजन महाप्रसाद होणार आहे. तरी लातूर शहर व परिसरातील सर्व भाविक, भक्तांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन इस्कॉन लातूर जगन्नाथ मंदिर येथील आचार्य कृपा प्रभूजी यांनी केले आहे.

## राष्ट्रीय 'मिडकॉम्स २०२६'मध्ये एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील डॉ. व्यंकटेश हंगे यांना 'सर्वोत्कृष्ट शोधनिबंध सादरीकरण' पुरस्कार

तभा वृत्तसेवा



लातूर, दि. ९ जुलै : मुख व जबडा शस्त्रक्रिया विषयातील उल्लेखनीय संशोधनाबद्दल एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील मुख व जबडा शल्य चिकित्सा विभागाचे सहयोगी प्रा. डॉ. व्यंकटेश हंगे यांना राष्ट्रीय स्तरावरील 'मिडकॉम्स २०२६' अधिवेशनात प्रतिष्ठेचा 'सर्वोत्कृष्ट शोधनिबंध सादरीकरण' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

'एक परिपूर्ण शल्यचिकित्सक घडवणे' या संकल्पनेवर आधारित २८ वी मध्यावधी परिषद आणि १४ वे पदव्युत्तर अधिवेशन भारतीय मुख व जबडा शल्यचिकित्सक संघटनेच्या (एओएमएसआय) मध्य प्रदेश राज्य शाखेतर्फे २ ते ४ जुलै २०२६ या कालावधीत मध्य प्रदेशातील भोपाळ येथील पीपल्स विद्यापीठाच्या परिसरात आयोजित करण्यात आले होते.

डॉ. व्यंकटेश हंगे यांना 'अत्यंत झिजलेल्या वरच्या जबड्यात ट्रान्स-नाझल दंत रोपणाच्या यशाचा अंदाज वर्तवणारे गुणांकन प्रारूप' या विषयावरील नाविन्यपूर्ण वैज्ञानिक शोधनिबंधासाठी हा सर्वोच्च सन्मान मिळाला. अत्यंत झिजलेल्या वरच्या जबड्याच्या हाडांमध्ये ट्रान्स-नाझल दंत रोपण यशस्वी होण्याची शक्यता अचूकपणे वर्तविण्यासाठी त्यांनी विकसित केलेले गुणांकन प्रारूप क्लिष्ट शस्त्रक्रियांमध्ये शल्यचिकित्सकांना योग्य निर्णय घेण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. गंभीर रुग्णांवरील उपचार अधिक सुरक्षित, अचूक आणि परिणामकारक करण्याच्या दृष्टीने हे संशोधन महत्त्वपूर्ण मानले जात आहे.

या संशोधनाची दखल घेत वैज्ञानिक समितीने डॉ. हंगे यांना ४ जुलै रोजी झालेल्या 'दंतरोपण शास्त्र - १' या शास्त्रीय सत्राचे अध्यक्ष म्हणून निमंत्रित केले होते. त्यांच्या संशोधन व शैक्षणिक योगदानाचा हा आणखी एक गौरव मानला जात आहे. तसेच क्लिष्ट दंत रोपण शस्त्रक्रिया अधिक सुरक्षित, वैज्ञानिक आणि यशस्वी करण्याच्या दृष्टीने त्यांनी सादर केलेले संशोधन हे परिषदेचे विशेष आकर्षण ठरले.

भारतीय मुख व जबडा शल्यचिकित्सक संघटनेच्या राष्ट्रीय कार्यकारिणी व आयोजन समितीच्या मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार व प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. संघटनेचे अध्यक्ष डॉ. आशिष गुप्ता आणि नियुक्त अध्यक्ष तथा आयोजन अध्यक्ष डॉ. शाजी थॉमस यांच्या हस्ते डॉ. व्यंकटेश हंगे यांचा गौरव करण्यात आला. यावेळी मानद सरचिटणीस डॉ. कन्नन बालरामन, आयोजन सह-अध्यक्ष डॉ. अजय पिल्लई, आयोजन सचिव डॉ. निशांत राज चौरसिया, परिषद सचिव डॉ. मणिकंधन रामनाथन, वैज्ञानिक समितीच्या अध्यक्षा डॉ. सुस्मिता राजमोहन व्यास आणि कोषाध्यक्ष डॉ. प्रशांत एम. सी. उपस्थित होते.

## संजय गांधी निराधार योजना समितीची बैठक; १३६८ अर्जाची छाननी

तभा वृत्तसेवा

लातूर दि.९ जुलै : लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीची बैठक लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड यांच्या सूचनेनुसार ८ जुलै २०२६ बुधवार रोजी घेण्यात आली असून समितीचे अध्यक्ष बन्सी भगवानराव भिसे यांच्या अध्यक्षतेत झालेल्या पहिल्या बैठकीत प्रत्यक्ष दाखल केलेल्या ३०० अर्जाची छाननी करून २८० अर्ज मंजूर करण्यात आले तर उर्वरित ऑनलाईन दाखल केलेल्या १०६८ अर्जाची छाननी करण्यात येत आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती १३ मे २०२६ रोजीच्या पत्रानुसार गठीत करण्यात आली आहे. गोरगरीब, सर्वसामान्य गरजू पात्र लाभधारकांना, निराधारासह विधवा आणि अपंगांना तात्काळ बैठक घेऊन लाभ द्यावा अशी सूचना आ. रमेशआप्पा कराड यांनी नव्याने गठीत झालेल्या समितीस केली होती. सदरील सूचनेनुसार ८ जुलै बुधवार रोजी समितीचे अध्यक्ष बन्सीभाऊ भिसे यांच्या अध्यक्षतेखाली लातूर तहसील कार्यालयात बैठक झाली.

या बैठकीत प्रत्यक्ष दाखल केलेले ३०० अर्ज आणि ऑनलाईन दाखल केलेले १०६८ असे एकूण १३६८ अर्ज ठेवण्यात आले होते त्यापैकी प्रत्यक्ष दाखल केलेल्या ३०० अर्जाची छाननी करून २८० अर्जांना मंजुरी देण्यात आली तर उर्वरित त्रुटी असल्याने २० अर्ज नामंजूर करण्यात आले. उर्वरित ऑनलाईन दाखल केलेल्या अर्जाची छाननी करण्यात येत आहे. बैठकीच्या प्रारंभी समिती सचिव तथा तहसीलदार सौदागर तांदळे यांनी समितीचे अध्यक्षासह सर्व सदस्यांचा सत्कार करून स्वागत केले.

लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीच्या बैठकीस समितीचे अध्यक्ष बन्सी भगवानराव भिसे, सचिव तथा तहसीलदार सौदागर तांदळे, सदस्य तथा गटविकास अधिकारी श्याम गोडभरले, सदस्य परमेश्र्वर माधवराव पर्वते, सौ स्वाती किशोर घुट्टे, संतोष नारायण गायकवाड, अंकुश हरिभाऊ कुंभार, विनायक मल्हारी मगर, सदाम रशीद शेख, सदाशिव सोपान गव्हाणे, रुपेश सूर्यकांत काळे, बाबासाहेब साहेबराव भिसे यांच्यासह नायब तहसीलदार परमेश्र्वर कांबळे, सौ सुषमा कोपरकर, महेश आदमाने आदी तहसील कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# हिंगोली जिल्ह्यात २ तासांत भूकंपाचे चार धक्के

## जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिली भूकंपग्रस्त भागाला भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ जुलै**

हिंगोली जिल्ह्यातील वसमत, कळमनुरी तसेच औंढा नागनाथ, हिंगोली या भागात दि ९ जुलै रोजी पहाटे १.३७ मिनिटापासून काही काळाच्या अंतराने चार भूकंपाचे धक्के जाणवले. या भूकंपामुळे पांगरा शिंदे, खापरखेडा, शिरळी तसेच काकडदाभा या ठिकाणी काही घरांना तडे गेले आहेत. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवीत हानी झाली नाही. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी तातडीने पथकांसह पांगरा शिंदे, खापरखेडा आदी गावांना भेटी देत पाहणी केली असून नागरिकांना घाबरून न जाण्याचे आवाहन केले आहे. परंतु मागील काही वर्षापासून सतत होणाऱ्या भूकंपामुळे नागरिक भयभीत झाले आहेत.

मागील काही वर्षापासून हिंगोली जिल्ह्यात भूकंपाचे धक्के बसत आहेत. जमिनीतून गुढ आवाज येत आहेत. दि ९ जुलै च्या पहाटे १.३७ मिनीटांनी भूकंपाचे धक्के जाणवले. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता ४.६ रिश्टर स्केल नोंद झाली आहे. या भूकंपाचे केंद्रबिंदू वसमत तालुक्यातील शिरळी असून खोली १० किमी आहे. त्यानंतर दुसरा धक्का २.१५ मिनीटांनी ३.६ रिश्टर स्केल, २.१५ मिनीटांनी ३.९ रिश्टर स्केल, ३.२३ मिनीटांनी चौथ्यांदा ४.१ रिश्टर स्केलचा भूकंप झाला आहे. त्याचे केंद्र औंढा नागनाथ तालुक्यातील काकडदाभा हे होते. दोन तासात चार वेळा जिल्ह्यात नागरिकांना भूकंपाचे धक्के जाणवल्यामुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांनी रात्र जागून काढली. या भूकंपाचे धक्के वसमत, हिंगोली, कळमनुरी, औंढा नागनाथ बसले आहेत.

आमदरी येथील एका घराची भिंत कोसळली असून दहा ते बारा घरांना तडे गेले आहेत. पांगरा शिंदे गावात ५० ते ६० घरांच्या भिंतीना तडे गेले आहेत.

दरम्यान दि ९ जुलै रोजी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी पांगरा शिंदे, खापरखेडा या गावांना भेटी देत नुकसानग्रस्त भागाची, घरांची पाहणी केली तसेच नागरिकांशी संवाद साधला. यावेळी जिल्हाधिकारी गुप्ता म्हणाले की, जिल्ह्यातील नागरिकांनी घाबरून जाऊ नये, आपत्कालीन परिस्थितीशी सामना करण्यास प्रशासन सज्ज असून स्थानिक यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. आपत्कालीन परिस्थिती किंवा नुकसान आढळल्यास तातडीने प्रशासनाशी संपर्क साधावा. नागरिकानीही समाजात भितीचे वातावरण निर्माण होईल अशा प्रकारचे संदेश समाज माध्यमातून पोस्ट करू नयेत अशा सूचना दिल्या आहेत.



# विविध मागण्यांसाठी जि. प. शिक्षकांचे जिल्हाकचेरीसमोर धरणे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ जुलै**

कार्यरत शिक्षकांना टीईटी अनिवार्यता, पदोन्नतीविषयक अन्यायकारक अटी, संचमान्यतेचे चुकीचे धोरण तसेच बीएलओ कामाची सक्ती यासह विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेच्या शिक्षकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेच्यावतीने जिल्हा परिषद शिक्षकांनी धरणे आंदोलन करीत विविध मागण्यांचे निवेदन जिल्हा प्रशासनाला सादर केले. त्यामध्ये दि १४ मे २०२६ शिक्षण संचालक यांच्या आदेशानुसार राज्यात विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक पदोन्नतीची प्रक्रिया तत्काळ थांबवण्यात यावी, कार्यरत सेवाज्येष्ठ शिक्षकांना टीईटी नियमात शिथीलता द्यावी, ४० टक्के गुण अशी शिथील करण्यात यावी, नैसर्गिक न्यायानुसार पदोन्नतीची संधी द्यावी, संचमान्यतेचे चुकीचे धोरण रद्द करण्यात यावे, बीएलओ च्या अशैक्षणिक कामातून प्राथमिक शिक्षकांची पूर्ण मुक्तता करण्यात यावी, एसआयआरच्या अतिरिक्त कामांमुळे शिक्षकांचे मानसिक व शारीरिक खच्चीकरण होत आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत आहे. कार्यरत शिक्षकांना समान काम समान वेतन नुसार सरसकट पदवीधर वेतनश्रेणी तत्काळ लागू करावी, जुनी पेन्शन योजना सरसकट लागू करावी, आंतरजिल्हा बदली प्रक्रिया सुरू करावी या मागण्यांसाठी संघटनेच्यावतीने राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनात पंडीतराव नागरगोजे, सचिन गायकवाड, व्ही डी देशमुख, विजय राठोड, गजानन बोरकर, रमेश खंदारे, किरण राठोड, दत्तराव पडोळे, टी जी पवार, चिमणाजी दळवी, माधव वायचाळ यांच्यासह शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# हिंगोलीत एनआरएचएमचे उपकेंद्र स्थापन करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ जुलै**



हिंगोली जिल्ह्यात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान एनआरएचएम अंतर्गत उपकेंद्र स्थापन करण्यात यावे, अशी मागणी राज्यसभा खासदार रामरावजी वडकुते यांनी केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची बुधवारी नवी दिल्ली येथे सदिच्छा भेट घेऊन केली. यावेळी त्यांनी यासंदर्भातील सविस्तर निवेदन मंत्र्यांना सादर केले.

निवेदनात हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना अधिक प्रभावी, सुलभ व दर्जेदार प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी एनआरएचएम उपकेंद्राची नितांत आवश्यकता असल्याचे नमूद करण्यात आले. जिल्ह्यात उपकेंद्राची स्थापना झाल्यास आरोग्य सेवा तळागाळापर्यंत पोहोचण्यास गती मिळेल तसेच सर्वसामान्य नागरिकांना वेळेवर उपचार, प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा आणि विविध शासकीय आरोग्य योजनांचा अधिक प्रभावी लाभ मिळण्यास मदत होईल, असे खासदार वडकुते यांनी स्पष्ट केले.

यावेळी केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी निवेदनाची दखल घेत संबंधित विषयाचा सकारात्मक विचार करून आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत आश्वासन दिल्याची माहिती देण्यात आली. हिंगोली जिल्ह्यात आरोग्य सुविधांच्या बळकटीकरणासाठी ही मागणी महत्त्वाची मानली जात आहे.



**हिंगोली– येथील जिल्हा सामान्य रूग्णालयात बालकांची २ डी इको तपासणी शिबीर पार पडले. यावेळी जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ नितीन तडस, डॉ गोपाल कदम, डॉ दिपक मोरे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### अंगणवाडी सेविकांना बीएलओ कामाची सक्ती थांबली, महासंघाच्या पाठपुराव्याला यश



हिंगोली– महाराष्ट्र राज्य अंगणवाडी सेविका व मदतनीस महासंघाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले असून राज्यातील अंगणवाडी सेविकांवर बी.एल.ओ काम सोपवले जाणार नाही, अशी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष भगवान देशमुख यांनी दिली आहे. या प्रश्नावर आयुक्तांकडे लेखी निवेदन देऊन सातत्याने पाठपुरावा केला होता. त्याच परिणाम म्हणून प्रशासनाने सकारात्मक पाऊल उचलले आहे. या बैठकीत दोन्ही प्रकल्पांच्या बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी यापुढे आयसीडीएस विभागामार्फत अंगणवाडी सेविकांना बी.एल.ओ. कामासंदर्भात कोणत्याही प्रकारच्या नोटीस देण्यात येणार नसल्याचे लेखी आश्वासन दिले. यावेळी राज्य संघटक दत्ता देशमुख, जिल्हाध्यक्ष सिंधुताई ठाकूर आणि जिल्हा संघटक नेताजी धुमाळ उपस्थित होते.

# भाजपच्या दिव्यांग विकास आघाडीच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ जुलै**

येथील शासकीय विश्रामगृहात भाजपच्या दिव्यांग विकास आघाडीची बैठक पार पडली. यावेळी दिव्यांगांना देण्यात येणाऱ्या लाभासंदर्भात विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष किसनराव मुटकुळे यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. यावेळी दिव्यांगांना विनाअट घरकुल द्यावेत, दिव्यांगांना अंत्योदय योजनेत समाविष्ट करावे, शासकीय जागेत व्यवसाय करण्यासाठी २०० चौ.फुट जागा द्यावी, दिव्यांगांना समितीवर घ्यावे, मतीमंद दिव्यांगांचे पालकत्व मंजूर करावे, कार्यालयात रॅम्प बसविण्यात यावेत, दिव्यांग पुर्नवसन केंद्र स्थापन करावेत, सामान्य रूग्णालयात दिव्यांग प्रमाणपत्रासाठी व तपासणीसाठी कालावधी तीन दिवसांचा करावा आदी मागण्यांचा यामध्ये समावेश असून मागण्या मान्य न केल्यास भाजप दिव्यांग आघाडी न्यायासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करणार असल्याचा इशारा यावेळी देण्यात आला आहे. या बैठकीत जिल्हाध्यक्ष किसनराव मुटकुळे, प्रदीप वानरे, हिरामण पोपते यांच्यासह दिव्यांग बांधव उपस्थित होते.

# औंढ्यात पावसाचे पाणी रस्त्यावर साचल्याने व्यापारीवर्ग त्रस्त

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली,९ जुलै**



औंढा येथे जोरदार व रिमझिम पावसाने बाजारपेठेतील रस्त्यावर पाणी साठल्याने व्यापारी त्रस्त झाले आहेत, तर नगरपंचायत दुर्लक्ष करत आहे. दोन ते तीन दिवसापासून जोरदार व रिमझिम पावसामुळे बाजारपेठेतील रस्त्यावर पाणी साठले आहे. त्यामुळे व्यापारी आणि नागरिक मोठ्या प्रमाणात त्रासले आहेत.

रस्त्यावर पाणी साचल्याने व्यापार आणि वाहतूक दोन्हीवर परिणाम झाला आहे. व्यापारी व नागरिकांनी नगरपंचायत प्रशासनाला वारंवार सांगितले.परंतु अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. व्यापाऱ्यांनी सांगितले की, या पाण्याचा त्यांच्या व्यवसायावर मोठा परिणाम होत आहे.

त्यामुळे त्यांना आर्थिक नुकसान होत आहे. तसेच, पाण्याचा निचरा नसल्याने रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचून राहिल्याने लोकांना त्रास सहन करावा लागतो आहे. मुख्य बाजारपेठ मधील रस्त्याच्या दोन्ही साईडला नाल्या नसल्याने पावसाचे पाणी हे रोडवरच साचत आहेत, त्यामुळे मुख्य बाजारपेठेतील रस्त्याच्या दोन्ही साईडला नाल्या तयार कराव्यात जेणेकरून पावसाचे पाणी त्या नाल्यामध्ये जाईल व रस्त्यावर पाणी साचले जाणार नाही, अशी मागणी व्यापाऱ्यातून होत आहे. त्वरित नगरपंचायतने याकडे लक्ष देऊन रोड तयार करून रोडच्या दोन्ही साईडला नाल्या कराव्यात अशी मागणी गेल्या काही दिवसापासून वारंवार होत आहे. येत्या काळामध्ये नगरपंचायत याकडे लक्ष देईल, का हेच बघावे लागेल.

# कुलगुरूंच्या सकारात्मक भूमिकेमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ९ जुलै**



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नित मॉडर्न कॉलेजमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी सुमेर सिद्दिकी यांनी बॅकलॉग विषयाचा परीक्षा अर्ज भरल्यानंतर त्यांना कोरे हॉलतिकीट देण्यात आल्याचा प्रकार निदर्शनास आला होता. या संदर्भात विद्यार्थ्याने थेट विद्यापीठाचे कुलगुरू यांची भेट घेऊन संबंधित बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली होती.

दरम्यान, विद्यापीठाने नवीन अभ्यासक्रमानुसार परीक्षा घेण्याबाबत महाविद्यालयांना निर्देश दिले होते. मात्र, जुन्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना त्याच अभ्यासक्रमानुसार परीक्षा देण्याची संधी उपलब्ध होणे आवश्यक असल्याची मागणी विद्यार्थ्यांकडून होत होती.

याच पार्श्वभूमीवर विद्यार्थी सुमेर सिद्दिकी व त्यांचे सहकारी विद्यापीठाचे माझी विफयर्थी करण बोबडे, पत्रकार नवीद अहेमद, ॲड सिद्दिकी, पत्रकार फारूकी यांनी विद्यार्थ्याच्या हितासाठी कुलगुरूंनची भेट घेऊन चर्चा केली व निवेदन सादर करून जुन्या अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची संधी उपलब्ध करून देण्याची विनंती केली. त्यावेळी कुलगुरूंनी ही समस्या केवळ एका विद्यार्थ्यापुरती मर्यादित नसून, अशाच परिस्थितीतील हजारो विद्यार्थी असल्याचे नमूद करत विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून योग्य निर्णय घेण्याची भूमिका व्यक्त केली होती.

विद्यार्थ्यांच्या हितासाठी पत्रकारांची मागणीची दखल घेत कुलगुरूंनी संबंधित मंडळाकडे प्रस्ताव सादर केला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताला प्राधान्य देत जुन्या अभ्यासक्रमानुसार परीक्षा घेण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचा मार्ग मोकळा झाला.

या निर्णयामुळे सुमेर सिद्दिकी यांच्यासह हजारो विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध झाली. या सुवर्णसंधीचा लाभ घेत अनेक विद्यार्थ्यांनी परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीला नवी दिशा मिळाली आहे.

या निर्णयानंतर सुमेर सिद्दिकी, त्यांचे वडील रिटायर पीएसआय मुसलोहोद्दीन सिद्दिकी तसेच त्यांचे सहकारी पत्रकार नवीद अहेमद  करण बोबडे,ऐडोकेट सिद्दिकी, पत्रकार फारुकी यांनी कुलगुरू, उपकुलगुरू तसेच परीक्षा मंडळाची प्रत्यक्ष भेट घेऊन शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून घेतलेल्या या निर्णयाबद्दल त्यांनी विद्यापीठ प्रशासनाचे विशेष आभार मानले.

या निर्णयामुळे सुमेर सिद्दिकी यांच्यासह हजारो विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध झाली. या सुवर्णसंधीचा लाभ घेत अनेक विद्यार्थ्यांनी परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीला नवी दिशा मिळाली आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताला प्राधान्य देत घेतलेल्या या निर्णयामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाचले, तसेच पुढील उच्च शिक्षण आणि करिअरच्या संधी खुल्या झाल्या. विद्यार्थी हित जपणारी कुलगुरूंची ही भूमिका विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी मोलाची ठरल्याची भावना विद्यार्थी व पालकांकडून व्यक्त केली जात आहे.

# उगमच्यावतीने संघनाईक तांडा, लक्ष्मण तांडा येथे पाणी तपासणी प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ जुलै**



उगम ग्रामीण विकास हिंगोली येथे लक्ष्मण नाईक तांडा, संघनायक तांडा,काळापाणी तांडा,रेवनसिद्ध तांडा, व पवार तांडा या तांड्यावरील पाणी व स्वच्छता समिती सदस्यांचे एक दिवसाचे प्रशिक्षण उगम ग्रामीण विकास संस्थेचे अध्यक्ष जयाजी पाईकराव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

यावेळी बोलतांना ते म्हणाले की, प्रत्येक तांडे पाणीदार झाले पाहिजे. जलसमृद्ध झाले. पाहिजे पाणी भरपूर उपलब्ध झाले की, सांडपाण्याची विल्हेवाट योग्य पद्धतीने लावली पाहिजे. गाव स्वच्छ ठेवले पाहिजे. पाण्याचा मुख्य स्त्रोत फक्त पाऊस आहे. पावसाचे पाणी कसे अधिकार अधिक गाव शिवारात अडविले पाहिजे, जिरवली पाहिजे त्यासाठी पाणलोट क्षेत्र विकासाची संपूर्ण उपचार पद्धती अमलात आणली पाहिजे.

यावेळी दिशांत, विकास कांबळे, धनंजय पडघन, राम खंदारे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भीमराव पाईकराव यांनी केले. तर आभार प्रदर्शन बौद्धभूषण पातोडे यांनी केली हे प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी विजय पवार, सिद्धार्थ निनुले, विठ्ठल पतंगे, अमोल माहोरे, अमोल चेंडके, ज्ञानेश्वर दळवी, पल्लवी, निकिता, परमेश्वर सूर्यवंशी यांनी विशेष परिश्रम घेतले तर यावेळी पाचही तांड्यावरील २३ पाणी व स्वच्छता समिती सदस्य उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# नांदेड - लातूर महामार्गावरील उड्डाण पूल ढासळला



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ९ जुलै**

नांदेड -लातूर महामार्गावरील शहरालगत असलेल्या एसजीजीएस कॉलेज समोरील उड्डाणपूल दिनांक ९ जुलै रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास ढासळला. सुदैवाने यात जीवित हानी झाली नाही. ही घटना कळताच नांदेड ग्रामीण पोलिसांनी धाव घेऊन पूर्ण मार्गावरील रहदारी इतर मार्गाने वळवून वाहतूक सुरळीत केली. या दुर्घटनेत कॉलेजच्या दोन मुलींना साधारण दुखापत झाल्याचे समजते.

## सुदैवाने जीवीत हानी नाही

नांदेड - लातूर महामार्गावरील एसजीजीएस इंजीनियरिंग कॉलेज समोरील उड्डाणपुलाचा अर्धा भाग कोसळुन पडला.पण सुदैवाने या घटने दरम्यान त्या ठिकाणी रहदारी नसल्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. सदरील पुलाचे काम पूर्ण होऊन केवळ एक वर्ष कालावधी लोटला आहे. पूल ढासळल्याने या पुलाचे काम निकृष्ठ दर्जाचे झाल्याचे उघड झाले आहे. सदरील कामाचा दर्जा लक्षात घेता यावर प्रशासन काय कारवाई करणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. सदरील घटना कळताच ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचाऱ्यांनी येथील रहदारी नियंत्रणात आणून त्यांना इतर मार्गाने वळवून रहदारी सुरळीत करून परिस्थिती आटोक्यात आणली. नांदेड शहरालगत अशाप्रकारचे कांहीं नव्याने फुलाची कामे झाली आहेत आणि चालू आहेत पण यांच्या कामाच्या दर्जाकडे प्रशासनाने लक्ष देऊन अशा प्रकारच्या दुर्घटना होणार नाही त्यांची दक्षता घ्यावी अशी नागरिकांची मागणी आहे. सदरील दुर्घटनेचा येथील नागरिकांनी निषेध व्यक्त करून गुत्तेदारावर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी नागरिका द्वारे होत आहे.

# नांदेड जिल्ह्यास भुकंपाचे सौम्य धक्के

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ९ जुलै -**

हिंगोली, नांदेड, परभणी जिल्ह्यामधून आज दिनांक ०९ जुलै २०२६ रोजी ०१:३७ मी., ०२:१५ मी. व ०२:१७ मिनिटांनी भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले.अधिकृतरित्या दिलेल्या वृत्तानुसार या भूकंपची तीव्रता रिष्टर स्केल वर अनुक्रमे ४.६, ३.६ व ३.९ अशी नोंदविण्यात आलेली आहे.

भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील सिरळी या गावात असून या धक्क्यामुळे कुठलीही जीवित व वित्त हानी झाली नसल्याची प्राथमिक माहिती जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्राने दिली.

सदर भूकंपाचे धक्के हे मध्यरात्री जाणवले आहेत. धक्के बसले तेंव्हा बरेच लोक झोपेत होते. एकापाठोपाठ एक असे दोन धक्के जाणवले. भूकंपाची पूर्वकल्पना देणे शक्य नसल्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क रहावे. भूकंपाचे धक्के जाणवताच घराबाहेर पडून मोकळ्या जागेत जमावे. असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

## योजनेचा लाभ घ्यावा

**नांदेड** -महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ यांच्या उपकंपनीच्या विविध १४ महामंडळामार्फत इतर मागासवर्गीय समाजाच्या सर्वांगिन कल्याणासाठी बेरोजगारांसाठी स्वयंम उद्योगासाठी विविध कर्ज योजना राबविण्यात येतात. सदर कर्ज योजना ही बँकेमार्फत असून लाभार्थ्यांने महामंडळाच्या वेबसाईडवर ऑनलाईन अर्ज www.msobcfdc.org या संकेतस्थळावर भरावा. तसेच सदर योजनेचा लाभ हा इतर मागासवर्गीय समाजातील व्यक्तीने जास्तीतजास्त घ्यावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक एस. एन. झुंजारे यांनी केले आहे.



# विविध मागण्यांसंदर्भात शिक्षक संघटनांकडून मुख्यमंत्र्यास निवेदन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ९ जुलै -**

शिक्षकांच्या विविध महत्वपूर्ण प्रलंबित मागण्यांसंदर्भात जिल्ह्यातील सर्व शिक्षक संघटनांकडून, जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मुख्यमंत्र्यांस निवेदन देण्यात आले . जिल्हाधिकारी यांच्यावतीने उप जिल्हाधिकारी संतोषी देवकुळे यांनी निवेदन स्वीकारले.उपरोक्त मागण्यांसंदर्भात उप जिल्हाधिकारी यांचेशी सर्व शिक्षक संघटनांच्या वतीने युवराज पोवाडे यांनी सविस्तर भूमिका व्यक्त केली. मुख्यमंत्र्यास देण्यात आलेल्या निवेदनात पुढीलप्रमाणे मागण्या आहेत.

आरटीई ॲक्ट २००९ चा कायदा अंमलात येण्यापूर्वी नियुक्त झालेल्या कार्यरत शिक्षकांवर लादण्यात आलेली टीईटी परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट तात्काळ रद्द व्हावी म्हणून आपल्यास्तरावरून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. कार्यरत शिक्षकांची टी.ई.टी. परीक्षा घ्यावयाचीच असेल तर तमिळनाडू, केरळ , कर्नाटक व उत्तर प्रदेश मधील निर्णयाप्रमाणे निर्णय घ्यावा. दि. १४ मे २०२५ च्या मा. शिक्षण संचालक पुणे यांच्या पत्रानुसार १ सप्टेंबर २०२५ पर्यंत उत्तीर्ण असणाऱ्या टी.ई.टी. धारक शिक्षकांना दिलेल्या पदोन्नत्या रद्द करून, सेवाज्येष्ठ शिक्षकांवरील अन्याय दूर करावा. विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, पदवीधर व मुख्याध्यापक पदोन्नतीमधील अन्याय दूर करावेत. शिक्षकांना इडज , डखठ व यांसारखी अशैक्षणिक कामे देणे बंद करावे. विद्यार्थी व शाळा विरोधी 'संचमान्यता धोरण' रद्द करण्यात यावे.

यावेळी युवराज पोवाडे, जी.एस मंगनाळे ,विठ्ठल चव्हाण, बाबुराव कैलासे , एल बी चव्हाण, संतोष अंबुलगेकर, तसलीम शेख, व्यंकट कल्याणपाड, एच व्ही चिवडे, सुधाकर गायकवाड, ज्ञानेश्वर कल्याणकर, शंकर हासगुळे,दिलीप देवकांबळे,निळकंठ चोंडे, अशोक पवळे, संग्राम झूडपे,,डी एस धात्रक, माधव पचलिंग,जी बी मोरे, सुधाकर धडके,रवि बंडेवार, अशोक पाटील, नागनाथ गाभणे,माणिक कदम,दिपक लोहबंदे ,विलास जाधव,नाथा केंद्रे,प्रमोद पाटील,संजय शेळगे,एम ए कदीर,,रमेश घुमलवाड,बेग मोतीपाशा ,बालाजी चंदावाड आदी उपस्थित होते.

## उद्योजक कवळे गुरुजी यांनी घेतली केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट

**नांदेड, दि. ९ जुलै** - नांदेड जिल्ह्याचे लोक कल्याणकारी शेतकरी नेते तथा उद्योजक मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची सदिच्छा भेट घेऊन नव्याने सुरु होणाऱ्या एम.व्ही.के.ग्रो कुसुम नगर वाघलवाडा साखर कारखान्याच्याउभारणीसंदर्भात सविस्तर चर्चा केली आहे . यावेळी साखर कारखान्यामुळे परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना होणारा लाभ, रोजगारनिर्मिती, ग्रामीण भागाचा आर्थिक विकास तसेच आवश्यक पायाभूत सुविधांबाबत सकारात्मक विचारविनिमय करण्यात आला. या भेटीदरम्यान नितीन गडकरी यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला तसेच कार्यअहवाल आणि आयकॉन महाराष्ट्र या प्रकाशनांच्या प्रती भेट देण्यात आल्या. शेतकरी हित आणि ग्रामीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेले मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांची ही भेट निश्चितच विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणारी आहे .



## अनवर शेख यांची भाजपा मंडळाध्यक्षपदी नियुक्ती

**नांदेड** -भारतीय जनता पार्टीच्या अल्पसंख्याक - महानगर मोर्चात संघटन विस्ताराला गती देत नवीन नियुक्ती व प्रवेश कार्यक्रम उत्साहात पार पडला. अल्पसंख्याक महानगर मोर्चाचे अध्यक्ष तथा नांदेड- वाघाळा शहर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक मोहम्मद अनवर बारी हुसैन उर्फ अनुभाई यांनी पीर बुरान येथील मोहम्मद अनवर शेख यांची मंडळाध्यक्षपदी नियुक्ती केली. यावेळी त्यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत अनेक युवकांनीही भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. नवप्रवेशितांचे स्वागत करत पक्ष पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या सहभागामुळे संघटना अधिक बळकट होईल आणि जन-सेवा व संघटन विस्ताराला गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.



## मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कामाची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

**नांदेड** -भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यभर सुरू असलेल्या मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण (Special Intensive Revision - SIR) कार्यक्रमांतर्गत ०८७ नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत व त्रुटीमुक्त करण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत प्रत्येक पात्र नागरिकाची मतदार म्हणून नोंद सुनिश्चित करणे, मृत अथवा स्थलांतरित मतदारांची माहिती अद्ययावत करणे तसेच मतदारांच्या तपशीलांचे डिजिटायझेशन करण्यात येत आहे. याच अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी उस्मानशाही मिल, सिडको परिसरातील प्रभाग क्रमांक ६ मधील कामात अपेक्षित प्रगती नसलेल्या २० मतदान केंद्रस्तरीय अधिकारी व त्यांच्या पर्यवेक्षकांची बैठक घेतली. यावेळी त्यांनी पुढील दोन दिवसांत कामात लक्षणीय प्रगती करण्याचे निर्देश देत, कामात निष्काळजीपणा आढळल्यास संबंधितांविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिला.

# मतदार यादीतील त्रुटी असलेल्या नागरिकांनी कोणतीही भीती बाळगु नये : तहसीलदार डॉ. आनंद देऊळगावकर

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ९ जुलै -**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्यात दि.३० जून ते २९ जुलै या कालावधीत विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (डखठ) मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत मतदार यादीतील नावे अचूक, अद्ययावत व त्रुटीमुक्त करण्यासाठी व्यापक स्तरावर काम सुरू असून, मतदारांच्या नावांमध्ये कोणत्याही प्रकारची तफावत किंवा अनॉमली (पोरश्रू) असल्यास संबंधित मतदारांनी घाबरून न जाता नियोजित प्रक्रियेनुसार अर्ज सादर करावेत, असे आवाहन मुदखेडचे कर्तव्यदक्ष तहसीलदार डॉ. आनंद देऊळगावकर यांनी माध्यमांशी बोलताना केले.

तहसीलदार डॉ. देऊळगावकर यांनी सांगितले की, सध्या दि.३० जून ते १५ जुलै या पहिल्या टप्प्यात ज्या मतदारांच्या नावामध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी, तफावत किंवा अनॉमली नाही, अशा मतदारांचे गणनापत्र व अर्ज बीएलओ (ब्लॉक लेव्हल ऑफिसर) यांच्यामार्फत स्वीकारण्याचे काम सुरू आहे.


तर १५ जुलैपासून सुरू होणाऱ्या दुसऱ्या टप्प्यात मतदार यादीतील नाव, आडनाव, स्पेलिंग, वैयक्तिक तपशील किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या त्रुटी असलेल्या मतदारांचे अर्ज स्वीकारले जाणार आहेत. अशा प्रकरणांमध्ये संबंधित मतदारांकडून आवश्यकतेनुसार शपथपत्र तसेच आवश्यक पुरावे व कागदपत्रे स्वीकारण्यात येतील. त्यानंतर निवडणूक विभागाच्या प्रशासकीय स्तरावर सुनावणी घेऊन कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल आणि नियमांनुसार मतदारांच्या नावांतील त्रुटी दुरुस्त करण्याची कार्यवाही केली जाईल.

या विशेष मोहिमेदरम्यान राज्यातील प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्यासाठी बीएलओ प्रत्यक्ष नागरिकांच्या घरी जाऊन माहिती संकलित करणार असून, आवश्यक ती पुढील कार्यवाही करतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# विष्णुपुरी पूल दुर्घटनेची उच्चस्तरीय चौकशी करा आ. बोंढारकर यांची अधिवेशनात मागणी

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ९ जुलै -**

नांदेड जिल्ह्यात मध्यरात्री झालेल्या ४.२ रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपामुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीची राज्य शासनाने तातडीने दखल घ्यावी, नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे करून बाधित नागरिकांना त्वरित मदत व नुकसानभरपाई जाहीर करावी तसेच विष्णुपुरी येथील राष्ट्रीय महामार्गावरील पूल कोसळल्याची घटनेची चौकशी करावी अशी मागणी आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी विधानभवनातील पावसाळी अधिवेशनादरम्यान केली.



नांदेड येथे मध्यरात्री झालेल्या भूकंपामुळे जिल्ह्यात अनेक ठिकाणी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही गावांमध्ये घरांच्या भिंतींना तडे गेले असून काही भिंती कोसळल्याच्या घटनाही घडल्या आहेत. तसेच काही रस्त्यांनाही तडे गेल्याचे समोर आले आहे.

याशिवाय विष्णुपुरी येथील राष्ट्रीय महामार्गावरील पूल कोसळल्याची अत्यंत गंभीर घटना घडल्याचे सांगत, या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली. शासनाने तातडीने आपत्कालीन यंत्रणा कार्यान्वित करून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, नुकसानग्रस्त भागांचे त्वरित पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी तसेच भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात, असेही आमदार बोंढारकर यांनी अधिवेशनात नमूद केले.

## जुना कौठा येथील भाविक अमरनाथ यात्रेसाठी रवाना

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ९ जुलै -**

जुना कौठा नांदेड येथील भाविकभक्त मोठ्या संख्येने रविवारी हर हर महादेवच्या घोषणा देत अमरनाथ यात्रेसाठी रवाना झाले आहेत. यामध्ये दत्ताभाऊ काकडे, शिवराम गोरे, ईश्वर काकडे, नारायण गोरे, तुकाराम काकडे, श्रीनिवास मात्रे, सुरेश वीर हे भाविकभक्त रवाना झाले आहेत.

जूना कौठा येथे आणि रेल्वेस्टेशनवर त्यांना शुभेच्छा देण्यासाठी मित्र मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढील प्रवास सुखरूप व आनंदाचा जावो, अशा शुभेच्छा मित्र मंडळींनी दिल्या.

# टि.सी. व मार्कमेमो देण्यास टाळाटाळ

## लिटल स्कॉलर्स शाळेच्या संस्थाचालकासह मुख्याध्यापकास वकीलामार्फत नोटीस

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ९ जुलै -**

टिसी व मार्कमेमो देण्यासाठी पैश्याची मागणी करुन आर्थिक पिळवणूक करणाऱ्या लिटल स्कॉलर्सच्या संस्था चालक, मुख्याध्यापक व कार्यालयीन कर्मचार्यांवर कारवाई करावी, अशी मागणी शकुंतलाबाई वाघमारे यांनी केली असून, शाळेच्या संस्था चालकास ॲड.प्रमोद नरवाडे यांच्यामार्फत सीपीसी ८० सेक्शननुसार नोटीस पाठवली आहे.

शकुंतलाबाई वाघमारे या सिध्दार्थनगर तरोडा येथील रहिवाशी असून, भाजीपाला विक्री करुन ते आपला व कुटुंबियांचा उदरनिर्वाह करतात त्यांचा मुलगा विजय वाघमारे यांचे सन २०२५ मध्ये निधन झाल्यानंतर त्यांच्या नातीची जबाबदारी त्यांच्यावर आली. त्यांची नात संघर्षा वाघमारे हि साई एज्युकेशन सोसायटी संचलित लिटल स्कॉलर्स पब्लिक स्कूल भावसार चौक येथे शिकत होती. दरम्यान दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी टिसी व मार्कमेमोची आवश्यकता असल्याने शाळेच्या संस्थाचालक, मुख्याध्यापक व कार्यालयीन कर्मचार्यांना विनंती केल्यानंतरही पैसे भरल्याशिवाय टिसी मिळणार नाही, अशी भूमिका शाळेच्या संस्था चालकांनी घेतली. तसेच जातीवाचक उल्लेख करत अपमानास्पद शब्द वापरण्यात आले. त्यामुळे त्यांनी या शाळेची तक्रार थेट माध्यमिक शिक्षण विभाग उपसंचालक, धर्मादाय आयुक्त, शिक्षणाधिकारी यांच्याकडे केली असून, ॲड.प्रमोद नरवाडे यांच्यामार्फत सीपीसी ८० सेक्शननुसार नोटीस देखील पाठवली आहे.

# किनवट मतदारसंघातील उमेदवारीवर न्यायालयीन सुनावणी

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ९ जुलै -**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर किनवट तालुक्यातील प्राथमिक कृषी पतपुरवठा व विकास सेवा सहकारी संस्था/ अधिकोष सहकारी संस्था मतदारसंघातील उमेदवारीवर न्यायालयीन वाद निर्माण झाला आहे. या मतदारसंघातून वैध ठरलेले राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे उमेदवार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा घोटीचे उपसरपंच राजू लक्ष्मणराव सुरोशे यांच्या उमेदवारीविरोधात भाजपचे कार्यकर्ते व आदिवासी सेवा सोसायटी घोटी चे प्रतिनिधी यशवंत करहाळे पाटील यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका (क्र. ७४३२/२०२६) दाखल केली आहे. या प्रकरणाची ८ जुलै रोजी न्यायमूर्ती एस. जी. चपळगावकर यांच्या दालनात सुनावणी झाली असून पुढील सुनावणी १३ जुलै रोजी होणार आहे. दरम्यान, १६ जुलैपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत असल्याने न्यायालयाच्या निर्णयानंतर जिल्हा बँक निवडणुकीतील राजकीय समीकरणे स्पष्ट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.






**करड येथिल मे. दिवाणी न्यायाधिशसो वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

**विशेष दिवाणी दावा नं.७०/२०२४**

विशेष दिवाणी दावा नं.७०/२०२४
श्री रविंद्र वसंतराव हुलवान
रा.३८३, शनिवार पेठ, मार्केट यार्ड,
नि-१४
कराड, जि. सातारा.......................वादी
विरूध्द
१. श्री विलास उत्तमराव पाटील
२. सौ करूणा विलास पाटील
दोघेही रा. धुप्पा, पो. रामतिर्थ,
ता. नायगांव, जि. नांदेड - ४३१५०५........ प्रतिवादी

ज्याअर्थी वादीनी प्रस्तूत दावा प्रतिवादी यांचेकडून कायदेशीर देय र.रू. ७०,००,०००/- अक्षरी सत्तर लाख फक्त वसूल होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

त्या अर्थी या जाहीर समन्सने प्रतिवादी नं १ श्री विलास उत्तमराव पाटील प्रतिवादी नं २ सौ करूणा विलास पाटील यांना कळविण्यात येते की त्यांनी सदरचे जाहीर समन्स प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत अगर याकामी नेमली तारीख ०३/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या मे. कोर्टात स्वतः अगर विधिज्ञामार्फत हजर होवून वादीचे दाव्यास कैफियत / म्हणणे देणेचे नाही असे गृहीत धरून तुमचे विरूद्ध वादीचा दावा एकतर्फा न्यायनिर्णित केले जाईल व तदनंतर तुमची कसलीही तकार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरचे जाहीर समन्स मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी आज तारीख ०७/०७/२०२६ रोजी प्रसिद्ध केले.

**(पी.ए. पवार)**
**कनिष्ठ लिपिक**
**दि. न्या. व स्तर कराड**


**(श्री. एस.व्हि. लांडगे)**
**अधिक्षक**
**दि. न्या. व स्तर कराड**


# अवैध धंद्यांविरोधात नागरिकांनी पुढे यावे : चंद्रशेखर कदम

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ९ जुलै -**

किनवटचे नवनियुक्त उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम यांनी पदभार स्वीकारल्यानंतर नागरिकाभिमुख आणि लोकसहभागावर आधारित पोलीस प्रशासन उभारण्याच्या दृष्टीने विविध सामाजिक घटकांशी संवाद साधण्यास सुरुवात केली आहे. व्यापारी, पत्रकार तसेच विविध संघटनांच्या प्रतिनिधींसोबत बैठका घेऊन त्यांनी कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी पोलीस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले.

व्यापाऱ्यांच्या बैठकीत बोलताना कदम यांनी एक कॅमेरा समाजासाठी हा उपक्रम राबविण्याचे आवाहन केले. प्रत्येक व्यापाऱ्याने आपल्या प्रतिष्ठानासमोर उच्च दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविल्यास गुन्ह्यांचा प्रतिबंध होण्याबरोबरच तपास प्रक्रियेलाही मोठी मदत होईल, असे त्यांनी सांगितले. सुरक्षित आणि गुन्हेमुक्त समाज घडविण्यासाठी व्यापाऱ्यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.



यावेळी त्यांनी नागरिकांना अवैध धंदे, मादक पदार्थांची विक्री, जुगार, मटका, वाळू तस्करी तसेच इतर कोणत्याही बेकायदेशीर कृत्यांची माहिती तात्काळ पोलीस प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले. माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येईल, तसेच उपयुक्त माहिती देणाऱ्यांना योग्य ते बक्षीसही दिले जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

दि. ९ जुलै रोजी किनवट येथे तालुक्यातील पत्रकारांची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत पोलीस प्रशासन आणि प्रसारमाध्यमांमध्ये अधिक प्रभावी समन्वय निर्माण करण्यावर भर देण्यात आला. समाजहिताच्या दृष्टीने अचूक, विश्वासार्ह आणि जबाबदार माहितीची देवाणघेवाण होणे आवश्यक असल्याचे मत कदम यांनी व्यक्त केले.

बैठकीस तालुक्यातील विविध प्रमुख दैनिके, वृत्तवाहिन्या आणि डिजिटल माध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते. पत्रकारांशी संवाद अधिक सुलभ आणि गतिमान व्हावा यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम यांनी स्वतःचा तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. रोहन नीलभ यांचा संपर्क क्रमांक पत्रकारांना उपलब्ध करून दिला. यामुळे पोलीस प्रशासन आणि माध्यमांमधील समन्वय अधिक बळकट होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नागरिकांना पोलीस प्रशासनाशी थेट संपर्क साधता यावा आणि गोपनीय माहिती सहजपणे देता यावी यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयामार्फत ९९७५६७९७३३ हा हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात आला आहे. या क्रमांकावर नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या अवैध धंद्यांची, गुन्हेगारीची किंवा संशयास्पद हालचालींची माहिती गोपनीय पद्धतीने देता येणार असून, आवश्यक ती तातडीची मदतही उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे कदम यांनी सांगितले.

किनवट उपविभागात लोकसहभाग, पारदर्शकता आणि तत्पर प्रतिसाद या तत्त्वांवर आधारित पोलीस व्यवस्था उभारण्याचा आपला प्रयत्न राहील. नागरिक, व्यापारी, पत्रकार आणि सर्व सामाजिक घटकांच्या सहकार्याने कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी

# ग्रामीण महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी MACCIA तर्फे 'गाव तिथे उद्योजक'चे अनावरण

## 36,000 उद्योजक आणि 1.44 लाख रोजगार, 2031 चे उद्दिष्ट, पश्चिम महाराष्ट्राचे सुपुत्र रवींद्र माणगावे यांनी स्वीकारला अध्यक्षपदाचा पदभार

**मुंबई / सांगली , 8 जुलै २०२६ :** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड एग्रिकल्चर (MACCIA) ने राज्याच्या ग्रामीण आर्थिक परिदृश्यात परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने आपल्या महत्त्वाकांक्षी 'गाव तिथे उद्योजक' उपक्रमाचा अधिकृतपणे शुभारंभ केला आहे. एका भव्य पदग्रहण समारंभादरम्यान ही घोषणा करण्यात आली, जिथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पश्चिम महाराष्ट्राचे सुपुत्र व नवनिर्वाचित MACCIA अध्यक्ष रवींद्र माणगावे यांच्याकडे २०२६-२०२८ च्या कार्यकाळासाठी अध्यक्षपदाची धुरा सोपवली.

२०२६ ते २०३१ या कालावधीत चालणाऱ्या या उच्च-प्रभाव मोहिमेचे उद्दिष्ट महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये ३६,००० ग्रामीण सूक्ष्म उद्योजक तयार करण्याचे आहे. या व्यापक आर्थिक चळवळीमुळे १.४४ लाखांहून अधिक स्थानिक रोजगार संधी निर्माण होण्याची आणि उपक्रमाच्या तिसऱ्या वर्षापर्यंत अंदाजे ₹३,६०० कोटींची वार्षिक आर्थिक उलाढाल होण्याची अपेक्षा आहे. याव्यतिरिक्त, समुदाय-केंद्रित विकासाचे नेतृत्व करण्यासाठी ३०० सामाजिक उद्योजक विकसित करण्याची MACCIA ची योजना आहे.

"महाराष्ट्राला एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्याच्या उद्दिष्टाकडे वाटचाल करण्यासाठी प्रशासन MACCIAच्या या संकल्पनेच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे," असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूर्ण शासकीय सहकार्याचे आश्वासन दिले.

याला दुजोरा देत, उद्योगमंत्री उदय सामंत यांनी घोषणा केली की, "संस्थात्मक सहाय्य देण्यासाठी राज्याचा उद्योग विभाग लवकरच MACCIA सोबत सामंजस्य करार करणार आहे. शिवाय, सरकार आणि चेंबर संयुक्तपणे 'उद्योजक जनता दरबार' सुरू करणार आहेत, जे औद्योगिक आणि व्यावसायिक तक्रारींचे थेट आणि जलद निवारण करण्यासाठी डिझाइन केलेले एक फास्ट-ट्रॅक व्यासपीठ असेल.

MACCIA चे अध्यक्ष रवींद्र माणगावे यांनी यावर भर दिला की, "हा उपक्रम ग्रामीण तरुण, महिला, शेतकरी आणि स्वयंसहाय्यता गटांना सर्वसमावेशक प्रशिक्षण, तंत्रज्ञान, आर्थिक सहाय्य आणि सरकारी कल्याणकारी योजनांशी अखंड जोडणी प्रदान करून सक्षम करेल; ज्यामुळे 'नोकरी शोधणाऱ्यांचे रूपांतर नोकरी देणाऱ्यांमध्ये' होईल."

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे पार पडलेल्या या हायप्रोफाईल कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री उदय सामंत, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, विधानपरिषद सदस्य प्रवीण दरेकर, आमदार राहुल आवाडे, राजेंद्र पाटील यड्रावकर, बाबुराव कदम कोहळीकर आणि सत्यजित देशमुख, तसेच MACCIA चे अध्यक्ष रवींद्र माणगावे, ट्रस्ट बोर्डाचे अध्यक्ष आशिष पेडणेकर, मावळते अध्यक्ष संतोष मंडलेचा, ज्येष्ठ उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, गव्हर्निंग कौन्सिल, व्यवस्थापन समिती आणि कार्यकारी समितीचे सदस्य उपस्थित होते.


# सुंदरराव सोळंके महाविद्यालयात वन महोत्सव साजरा




**माजलगाव प्रतिनिधी:** मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वृक्षारोपण करून वन महोत्सव साजरा करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार १ ते ७ जुलै या कालावधीत सुंदरराव सोळंके महाविद्यालय परिसरात 50 वृक्षांची लागवड करून वन महोत्सव' साजरा करण्यात आला. सदरील कार्यक्रमासाठी प्रभारी प्राचार्य डॉ. एन. के. मुळे, उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, कनिष्ट महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.पवनकुमार शिंदे, प्रा.प्रकाश गवते, प्रबंधक डॉ.प्रशांत चव्हाण तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. ओमप्रसाद सारगे, डॉ. अर्चना कचरे, डॉ. सतीश डाके, डॉ.नितीन ढवळे, डॉ.बिलास काळे, प्रा.लक्ष्मन गिरी यांच्यासह प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी खरीप हंगामाचा पिक विमा 31 जुलै पूर्वी भरावा :- अनिल बोर्डे



**गेवराई (प्रतिनिधी) :** बीड जिल्ह्यात खरीप हंगाम 2026 साठी पंतप्रधान पिक विमा योजना सुरू झाली आहे. पिक विमा भरण्याची अंतिम मुदत 31 जुलै 2026 असून जिल्ह्यातील सर्व शेतकरी ग्राहकांनी मुदतीत विमा भरून लाभ घ्यावा, असे आवाहन ग्राहक पंचायत महाराष्ट्र, बीड जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे व तालुका कृषी अधिकारी सचिन गिरी यांनी संयुक्तपणे केले आहे.

तालुका कृषी अधिकारी सचिन गिरी यांनी दिलेल्या माहितीनुसार, यंदाच्या खरीप हंगामात पिक विमा योजनेत काही महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत.

**पिक विम्याचे नवीन नियम :-**

**1) किमान क्षेत्र :** किमान दहा गुंठे क्षेत्रावरील पिकाचा विमा भरता येणार. त्यापेक्षा कमी क्षेत्राचा विमा स्वीकारला जाणार नाही.

**2) पेरणी केलेले पीक :** शेतकरी ग्राहकाने प्रत्यक्ष पेरणी केलेल्या पिकाचा विमा भरावा. चुकीच्या पिकाचा विमा भरल्यास नुकसान भरपाई मिळणार नाही.

**3) हप्त्याचे दर :** सोयाबीन पिकासाठी संरक्षित रकमेच्या 2% तर कापूस पिकासाठी पाच टक्के हप्ता निश्चित करण्यात आला आहे.

**4) डिजिटल प्रक्रिया बंधनकारक :** विमा अर्ज भरताना फॉर्मर आयडी अनिवार्य आहे. तसेच ई पीक पाहणी म्हणजेच डिजिटल क्रॉप सर्वे मोबाईल ॲप द्वारे करणे बंधनकारक आहे.

चुकीची माहिती दिल्यास कारवाई शासकीय जमीन, गायरान, स्मशानभूमी, तलाव देवस्थान यासारख्या अयोग्य जागेवर चुकीच्या पद्धतीने विमा भरल्याचे आढळल्यास संबंधित लाभार्थ्यांचे आधार कार्ड 5 वर्षासाठी ब्लॉक करण्यात येईल. तसेच त्या कालावधीत शासनाच्या कोणत्याही योजनेचा लाभ मिळणार नाही,

असा इशारा कृषी विभागाने दिला आहे. बोर्डे म्हणाले, " पिक विमा हा शेतकरी ग्राहकासाठी संकटाच्या काळातील आधार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नियमाचे काटेकोर पालन करून आपल्या शेतात प्रत्यक्ष पेरणी केलेल्या पिकाचाच विमा भरावा. जास्तीत जास्त शेतकरी ग्राहकांनी याचा योजनेचा लाभ घ्यावा.

# तुलसी महाविद्यालयात 'वन महोत्सव सप्ताह' उत्साहात संपन्न

**बीड (प्रतिनिधी) :** देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वन महोत्सव सप्ताहचा समारोप मंगळवारी (दि. ७) स्वच्छता अभियानाने करण्यात आला. या सप्ताहादरम्यान विविध पर्यावरणपूरक स्पर्धा आणि उपक्रम राबविण्यात आले होते. सप्ताहादरम्यान हरित शपथ, इंडोर प्लांट्स लावणे आणि पर्यावरण जनजागृती रॅली अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. समारोपाच्या दिवशी महाविद्यालयाच्या प्रांगणात, वर्गखोल्यांमध्ये आणि परिसरात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविका आणि विद्यार्थिनींनी एकत्र येत स्वच्छता मोहीम राबवली. या सर्व उपक्रमांमध्ये सहभाग नोंदविणाऱ्या विद्यार्थिनींना यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे आणि पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्या डॉ. अश्विनी बेद्रे यांनी पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज असल्याचे सांगत विद्यार्थिनींच्या उपक्रमांचे कौतुक केले. उपप्राचार्या श्रीमती सय्यद शहाना यांनी पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. श्वेता वंजारे यांनी प्रास्ताविकातून सप्ताहभर राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता लाड हिने केले, तर आभार नयन महालिंगे हिने मानले. या समारोप सोहळ्यास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# ठेवीदारांचा कष्टाचा पैसा त्यांना मिळावा - आ. सोळंके

**बीड, 09 जुलै :** ठेवीदारांचा कष्टाचा पैसा त्यांना मिळावा, अशी मागणी आमदार प्रकाश सोळंके यांनी केली आहे. ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, बीड येथील सभासद ठेवीदारांच्या ठेवी संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली.

तसेच,बीडमधील ज्ञानराधा मल्टीस्टेट, जिजाऊ मल्टीस्टेट, साईराम मल्टीस्टेट, छत्रपती मल्टीस्टेट, मातोश्री मल्टीस्टेट, राजस्थानी, मराठवाडा अर्बन (माजलगाव), लक्ष्मीमाता अर्बन, मुक्ताई अर्बन, शुभकल्याण मल्टीस्टेट, परिवर्तन मल्टीस्टेट, मंगलनाथ अर्बन, गंगाभारती पतसंस्था,या बँका संशयाच्या भोवऱ्यात अडकलेल्या आहेत. गेल्या काही महिन्यांपासून यामध्ये कुठल्याही प्रकारच्या ठेवी सर्वसामान्यांना वितरीत करण्यात आलेल्या नाहीत.

गेल्या अनेक दिवसांपासून या प्रकरणात ठेवीदारांना त्यांचे हक्काचे पैसे परत मिळावेत, यासाठी जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी सातत्याने सभागृहात आवाज उठवत असून संबंधित स्तरावर पाठपुरावा करत आहेत. या पार्श्वभूमीवर आज झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री यांनी विषयाची गांभीर्याने दखल घेत ठेवीदारांना न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक त्या सूचना संबंधित यंत्रणांना दिल्या.

# महावितरणच्या दोषामुळे शेतकरी पचत्राचा मृत्यू; दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई आणि वारसाला शासकीय नोकरी द्या

## आ. संदीप क्षीरसागर सभागृहात आक्रमक




**बीड दि.९ (प्रतिनिधी) :** बीड मतदारसंघातील मौजे हाजीपूर (ता. शिरूर का.) येथील एक अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक घटना समोर आली आहे. शेतात काम करत असताना वीज धक्क्याने (करंट लागून) तरुण शेतकरी कृष्णा उगले यांचा जागीच मृत्यू झाला आहे. हा सर्व प्रकार महावितरण विभाग आणि संबंधित कंत्राटदाराच्या अक्षम्य निष्काळजीपणामुळे घडला असून, दोषींवर तातडीने कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी आक्रमक मागणी आ. संदीप क्षीरसागर यांनी विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान केली आहे.

हाजीपूर (ता.शिरूर का.) येथे महावितरण विभागाचे काम सुरू होते. काम सुरू असताना तिथे सुरक्षेची कोणतीही आवश्यक ती काळजी आणि खबरदारी महावितरणचे संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्याकडून घेतली गेली नाही. विशेष धक्कादायक बाब म्हणजे, संबंधित शेतकऱ्याने ६ जून २०२६ रोजीच महावितरण विभागाकडे शेतातील निकामी पोल आणि धोकादायक तारा काढून घेण्याबाबत रीतसर अर्ज केला होता. मात्र, महावितरणच्या प्रशासनाने या अर्जावर वेळेत कोणतीही कारवाई केली नाही. प्रशासनाच्या याच दिरंगाईमुळे आज एका निष्पाप तरुण शेतकऱ्याला आपला जीव गमवावा लागला आहे.

दरम्यान, सदरील प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी अधिकारी आणि कंत्राटदारावर कडक कायदेशीर कारवाई व्हावी. मृत कृष्णा उगले यांच्या कुटुंबाला शासनाकडून आणि महावितरणकडून तात्काळ मोठी आर्थिक मदत मंजूर करण्यात यावी.

प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे निष्पाप शेतकऱ्याचा बळी गेल्याने बीड जिल्ह्यात तीव्र संताप व्यक्त होत असून, आता यावर शासनाकडून तातडीने निर्णय घेण्याची मागणी आ.क्षीरसागर यांनी केली आहे.

# भादलीच्या शेतकरी कन्येची एनआयएफटी कांगडा येथे ॲक्सेसरी डिझाईनसाठी निवड



**माजलगाव (प्रतिनिधी) :** भादली येथील शेतकरी कुटुंबातील कु. हर्षदा हनुमान गिरी हिने राष्ट्रीय स्तरावरील निफ्ट (NIFT) प्रवेश परीक्षेत यश मिळवत हिमाचल प्रदेशातील कांगडा येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (NIFT) येथे बी.डिझाईन (ॲक्सेसरी डिझाईन) अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळविला आहे.

कु. हर्षदा हिने फेब्रुवारी २०२६ मध्ये सुंदरराव सोलंके महाविद्यालय, माजलगाव येथून इयत्ता १२ वी विज्ञान शाखेची परीक्षा ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण केली. त्यानंतर तिने निफ्ट प्रवेश परीक्षेत यश संपादन करून देशातील प्रतिष्ठित फॅशन शिक्षण संस्थेत प्रवेश मिळविला.

विशेष म्हणजे, सुंदरराव सोलंके महाविद्यालय, माजलगाव येथून निफ्टमध्ये प्रवेश मिळविणारी ती पहिली विद्यार्थिनी ठरली आहे. त्यामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीत आणखी एका गौरवशाली यशाची नोंद झाली आहे.

कु. हर्षदा या प्रा. गिरी सर यांच्या पुतणी असून, शेतकरी कुटुंबातील प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत तिने हे यश संपादन केले आहे. तिची ही कामगिरी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल आमदार तथा संस्थेचे अध्यक्ष मा. प्रकाशदादा सोलंके, मा. सचिव सतीशभाऊ चव्हाण, महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी तसेच माजी विद्यार्थ्यांनी कु. हर्षदा हनुमान गिरी हिचे मनःपूर्वक अभिनंदन करून तिच्या उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# छत्र्या थेट अर्ध्या रस्त्यापर्यंत; पादचारी, महिला आणि शाळा-कॉलेजच्या विद्यार्थ्यांची सुरक्षा टांगणीला



**बीड:** (प्रतिनिधी) बीड शहरातील मुख्य रस्त्यांवर सध्या सिमकार्ड विक्रेत्यांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले असून, यामुळे सामान्य नागरिक, विद्यार्थी आणि वाहनधारकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः बस स्टँडच्या मागील रस्ता, जो छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून संतोषी माता टॉकीजकडे येतो, त्याठिकाणी परिस्थिती अत्यंत गंभीर झाली आहे.

या रस्त्यावर अनेक सिमकार्ड विक्रेते मोठ्या छत्र्या लावून बसलेले दिसतात. त्यांच्या या छत्र्या थेट अर्ध्या रस्त्यापर्यंत येतात, ज्यामुळे आधीच अरुंद असलेला रस्ता अधिकच संकुचित होतो. त्यातच या स्टॉल्सच्या बाजूला ग्राहकांची लागणारी वाहने आणि अस्ताव्यस्त पार्किंगमुळे रस्त्याचा मोठा भाग व्यापला जातो.

लहान मुला-मुलींचे छत्र्यांमध्ये अडकून अपघात! हा रस्ता बस स्टँड, संतोषी माता टॉकीज, सम्राट चौक, डीपी रोड आणि आदर्श नगरकडे जाणारा मुख्य मार्ग असल्याने येथे शाळा, कॉलेज आणि विविध ट्युशन क्लासेसला जाणाऱ्या लहान मुला-मुलींची तसेच महिलांची संख्या खूप मोठी असते. अनेक विद्यार्थी आणि पालक आपल्या दुचाकीवरून (बाईकवरून) या रस्त्याने जात असतात. परंतु, रस्त्यावर आलेल्या या सिमकार्ड विक्रेत्यांच्या छत्र्यांचा अंदाज न आल्यामुळे, बाईकवरून जाणाऱ्या लहान मुला-मुलींचे हात आणि कपडे या छत्र्यांमध्ये अडकून अनेकदा गंभीर अपघात झाले आहेत. सुदैवाने आतापर्यंत मोठा अनर्थ टळला असला, तरी रोज घडणाऱ्या या छोट्या-मोठ्या अपघातांमुळे विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.


# बीड शहरासहित जिल्ह्यातील दोन लाख बोगस मतदारांची नावे कमी होणार : सचिन मुळूक

## एसआयआर प्रक्रियेमुळे खरी लोकशाही उदयास येणार

बीड (प्रतिनिधी) सध्या जिल्ह्यात एसआयआर म्हणजे मतदार यादी पुनर्रचनेचे काम सुरू आहे. मतदार यादीतील अपात्र, मृत, स्थलांतरीत तसेच एकापेक्ष अधिक ठिकाणी नावे असलेल्या मतदारांची अचूक नोंद करण्यासाठी निवडणुक आयोगाने ही मोहिम हाती घेतली आहे. यामुळे बीड शहरासह जिल्ह्यातील दोन लाख बोगस मतदारांची नावे कमी होणार असल्याचे शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी म्हटले आहे.

जिल्हाप्रमुख मुळूक म्हणाले की, जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर मतदार यादीत मृत, स्थलांतरित, एकापेक्षा अधिक ठिकाणी नोंद असलेले तसेच अपात्र मतदार असल्याच्या तक्रारी अनेक वर्षांपासून होत आहेत. या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने सुरू केलेली एसआयआर प्रक्रिया महत्त्वाची ठरणार आहे. बीड शहरासह जिल्ह्यातील सुमारे दोन लाख बोगस मतदारांची नावे मतदार यादीतून कमी होण्याची शक्यता असून, सुरू असलेल्या एसआयआर प्रक्रियेमुळे निवडणूक व्यवस्था अधिक पारदर्शक होईल आणि लोकशाही अधिक बळकट होईल.

# लग्नानंतर अवघ्या चौदा महिन्यात विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या; पतीसह पाच जणांवर गुन्हा



**अंबाजोगाई :** लग्नानंतर अवघ्या वर्षभरातच २० वर्षीय विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना अंबाजोगाई तालुक्यातील सायगाव येथे उघडकीस आली आहे. सतत पैशांची मागणी करत शारीरिक व मानसिक छळ करून आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पतीसह सासरच्या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणातील फिर्यादी अब्दुल पाशामियाँ शेख (वय ४२ वर्ष, रा. न्यू काझी मोहल्ला, लातूर) यांनी आपली मुलगी सानिया हिचे लग्न २५ मे २०२५ रोजी सायगाव येथील साजेद हमेद शेख याच्याशी करून दिले होते. लग्न झाल्यानंतर काही दिवसांतच लोकांचे देणे देण्यासाठी माहेरहून ५० हजार रुपये आणण्याची मागणी सानियाकडे करण्यात आली. गरिबीची परिस्थिती असतानाही फिर्यादीने ५० हजार रुपये दिले. मात्र, त्यानंतरही सासरच्या लोकांकडून पुन्हा पैशांची मागणी करत सानियाला सतत शिवीगाळ, मारहाण व मानसिक त्रास देणे सुरूच राहिले.

सासरच्या जाचाला कंटाळून अखेर ५ जून ते ६ जून २०२६ च्या दरम्यान सानियाने सायगाव येथील राहत्या घरी लोखंडी पाईपला मफलरने गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवली. या प्रकरणी मृत सानियाचे पती साजेद हमेद शेख, सासरे हमेद हमजामियाँ शेख, दीर वाजेद हमेद शेख, सासू जबिन हमेद शेख (सर्व रा. सायगाव, ता.अंबाजोगाई) आणि नणंद शेख आयशा फिरोज मिर्झा (रा. लातूर) यांच्या विरुद्ध बर्दापूर पोलीस ठाण्यात आत्महत्येस प्रवृत्त करणे, मारहाण व हुंड्यासाठी छळ केल्याचा गुन्हा नोंदवला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर कांबळे करत आहेत. दरम्यान तीन आरोपी पकडण्यात आले असून दोन फरार आहे, तीन आरोपींना अंबाजोगाईच्या न्यायालयात हजर केले असता तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# बीबीए, बीसीए, बीएफए, प्रवेश प्रक्रिया सुरु : डॉ. संजय तांदळे

**बीड (प्रतिनिधी) :** राज्यातील बीबीए, बीसीए, एमबीए,एमसीए(इंटिग्रेटेड) आणि बॅचलर ऑफ फाईन आर्ट ( बीएफए ) या व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांची केंद्रभूत प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे सुरू झाली आहे. यंदा पीसीएम आणि पीसीबी गटाची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांनाही बीबीए, बीएमएस, बीबीएम आणि बीसीए अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशाची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रवेश वेळापत्रकानुसार बीबीए, बीएमएस, बीबीएम आणि बीसीए अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांना 16 जुलै 2026 पर्यंत ऑनलाईन नोंदणी करता येईल. या अभ्यासक्रमांची कागदपत्र पडताळणी व अर्ज निश्चिती 7 ते 17 जुलै दरम्यान होईल. त्यानंतर 19 जुलै रोजी तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिद्ध करून 20 ते 22 जुलै दरम्यान हरकती स्वीकारल्या जातील आणि 24 जुलै रोजी अंतिम गुणवत्ता यादी जाहीर केली जाईल. बीएफए अभ्यासक्रमांसाठी 14 जुलै रोजी रात्री 11.59 वाजेपर्यंत नोंदणी करता येणार असून, कागदपत्र पडताळणी 8 ते 15 जुलै दरम्यान होईल. बीएफएची तात्पुरती गुणवत्ता यादी 17 जुलैला प्रसिद्ध होईल, त्यावर 18 ते 20 जुलै पर्यंत हरकती नोंदवता येतील आणि अंतिम गुणवत्ता यादी 21 जुलैला जाहीर केली जाईल.

# DYSP पथकाची कारवाई : 2 कोटी 5 लाखाचा मुद्देमाल जप्त;महसूल विभागाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष?



**बीड (प्रतिनिधी) :** बीड शहरापासून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावरील इमामपूर शिवारात सुरू असलेल्या अवैध मुरूम उत्खननावर पोलीस उपअधीक्षक (डीवायएसपी) पथकाने धडक कारवाई करत दोन पोकलेन, दोन हायवा जप्त करण्यात आल्या असून तीन हायवा जागेवरून पसार झाल्या आहेत त्या हायवा चा शोध डी वाय एस पी पथक घेत आहे या वाहनांची किंमत जवळपास दोन कोटी पाच लाख रुपये असून या धडक कारवाईमुळे परिसरातील मुरूम माफियांमध्ये खळबळ उडाली असून महसूल विभागाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

ईमामपूर परिसरात मागील अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात पोकलेन, जेसीबीच्या साहाय्याने डोंगर खोदून अवैधरित्या मुरूम उत्खनन सुरू होते या भागातील बहुतांश गायरान जमिनीतून देखील उत्खनन केल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. इमामपूर शिवारात दररोज चार पोकलेने एकाच वेळी १५ ते १८ हायवा मुरूम वाहतूक केला जात होती या उत्खननामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असून पर्यावरणाचेही मोठे नुकसान होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

विशेष म्हणजे, महसूल विभागाचे कार्यालय जवळ असतानाही एवढ्या मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या अवैध उत्खननाकडे संबंधित यंत्रणेने दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे तलाठी, मंडळाधिकारी आणि तहसीलदार यांच्या भूमिकेबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात मुरूम उत्खनन व वाहतूक होत असताना देखील महसूल चे कर्मचारी अधिकारी हे कारवाई करण्यात का धजावत नव्हते असा देखील प्रश्न आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि पोलीस उपअधीक्षक व्यंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय सय्यद, अविनाश सानप, संतोष रणदिवे, कुलदीप औसरमल, शशिकांत ढाकणे आणि विशाल जगताप यांच्या पथकाने ही कारवाई केली. जप्त करण्यात आलेल्या वाहनांबाबत पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

या कारवाईनंतर अवैध गौण खनिज उत्खननाला संरक्षण कोणाचे होते, महसूल विभागाने यापूर्वी कारवाई का केली नाही आणि शासनाच्या महसुलाचे नुकसान करणाऱ्यांवर पुढे कोणती कठोर कारवाई होणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.